

# श्री साईलीला



द्वारका माई



# अनुक्रमणिका—जून १९७३


१. श्रीसाई वाक्सुधा

२. संपादकीय : आध्यात्मिकताच जगाला तारील (२)
राष्ट्रभाषेचें स्थान

३. श्रीसाई कीर्तनमाला, पुष्प ७ वें — ह. भ. प. (प्रा.) द. दि. परचुरे

४. गोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन (ले.६) — पु. मु. अत्रे

५. चैतन्य महाप्रभु (उत्तरार्ध) — दिवाकर अ. घैसास

६. "मी आपलं म्हणतो" — द. शं. टिपणीस

७. देवाची आठवण — सौ. श्री शहाणे

८. मनचं साधे तर दारिद्र्य कां बाधे ? — सौ. लक्ष्मीबाई पटवर्धन

९. श्री माधवनाथ महाराज — श्री. ना. हुद्दार

१०. श्री साईलीलेचे स्वरूप — चिपळूणकर गुरुजी

११. अनंतता — चिपळूणकर गुरूजी

१२. कविता:

- १. रामगीतांजलि पुष्प ३ — दिवाकर अ. घैसास
- २. निरंतर आत्मतत्व — शाम जुवळे
- ३. साक्षात्कार — रमाकांत वि. सरमळकर
- ४. माधव स्मृति — रा. मा. आडकर
- ५. साई तूंच एक आधार — सौ. शांता अं. सरोदे
- ६. श्रीसाई — रमेश 'आत्मा'

१३. शिरडी वृत्त —एप्रिल १९७३

१४. रामनवमी उत्सव कार्यक्रम



# श्री सा ई वा क्सु धा

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥

राम आणि रहीम एक । यत्किंचितही नाहीं फरक ।
मग भक्तींच कां धरावी अटक । वर्तावें तुटक किमर्थ ॥५०॥
काय तुम्ही लेंकरें मूढ । बांधा हिंदु-अविंधांची सांगड ।
व्हा दृढ सुविचारारूढ । तरीच पैलथड पावाल ॥५१॥
वादावादी नाहीं बरी । नको कुणाची बरोबरी ।
व्हा नित्य निजहिताचे विचारी । रक्षील श्रीहरी तुम्हांला ॥५२॥
योग-याग-तप-ज्ञान । हें सर्व हरिप्राप्तीचें साधन ।
असूनि हें जो हरिविहीन । व्यर्थ जनन तयाचें ॥५३॥
कोणी कांहीं केलिया अपकार । आपण न करणें प्रतिकार ।
करवेल तरी करा उपकार । उपदेश सार हा त्यांचा ॥५४॥

— साईसच्चरित, अध्याय १०.

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] जून १९७३ [ अंक ३

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपापक :

(प्रा.) द. दि. परचुरे, एम्. ए., प्रवीण.

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

टे. नं. ४४३३६१

# संपादकीय

## आध्यात्मिकताच जगाला तारील

( मे अंकावरून चालू )

आज जें कांहीं घडत आहे तें आपण सुधारत असल्याचे लक्षण आहे काय ? पांच पन्नास वर्षांपूर्वी प्रत्येक गांवांत एकात्मता असे, एकमेकांविषयीं बंधुभाव असे, अनीतीनें कोणी वागत नसे, वागलाच तर त्याबद्दल त्याला लाज वाटे आणि समाजांत त्याची छी:थू होई. आज प्रत्येक गांवांत सर्रास चोऱ्या, मारामाऱ्या व खून होत आहेत; लोक उघडउघड दारू पीत आहेत व जो पीत नाही तो जुनाट नि मागासलेला समजला जात आहे. सरकारला व इतर Public Undertakings ना फसविणें हेंच माणसाच्या हुशारीचें, व अर्थात् यशाचें, गमक होऊन बसलें आहे. खाजगी नीतिमत्ता तर सोडाच, पण सार्वजनिक नीतिमत्ता तरी सुधारावी यासाठी खास प्रयत्न कोणी करीत आहे काय ? राजकीय संस्था अनेक आहेत, पण सर्वांची घडपड आहे सत्तेसाठीं. अर्थात् आत्तांचा सत्ताधारी वर्ग सत्तेच्या जोरावर गबर होत आहे, त्या ऐवजी आपण सत्ता बळकवावी व गबर व्हावें यासाठी. समाजवाद, साम्यवाद, नुसताच राष्ट्रवाद, गरीबी हटाव या सर्वांत राष्ट्रांतील व्यक्तींची नीतिमत्ता सुधारावी या दृष्टीनें एक तरी कार्यक्रम आहे कांय ? तसें कोणीच बोलत नाहीं याचें कारण, लोकांपुढे बोलणारे जे नेते ते स्वतःच नीतिभ्रष्ट आहेत, म्हणून. ते कोणत्या तोंडाने या गोष्टी लोकांसमोर बोलणार ? स्वार्थ साधण्यासाठी परस्पर विरोधी संघटना खुशाल गळ्यांत गळे घालतात, व गेलेली लोकप्रियता मिळविण्यासाठी कोणतीही गोष्ट तत्वशून्यतेनें केली जाते. आतां पहा, सेना आणि सिनेमा यांचा कांही संबंध आहे काय ? पण सेनाभर्ती लोकप्रिय करण्यासाठी सिनेमा नटनटींना सेनेच्या रंगमंचांवर खुशाल नाचविलें जातें. प्रत्येक क्षेत्रांत खाबू लोक तुंबड्या भरीत आहेत अशी ओरड अत्यंत प्रतिष्ठित लोक करीत आहेत. जबाबदारीच्या जागांवरचे अधिकारी कसे नालायक व वशिल्याचीं धेंडें असतात याचीं तर शेकडों उदाहरणें वृत्तपत्रांत येत असतात. बरें, हें इथेंच आहे असें नाहीं. तथाकथित सुधारणेच्या शिखरावर असलेल्या देशांतही माणुसकीला कलंक फासणाऱ्या घटना वाढत्या प्रमाणावर घडत आहेत.

"शिकागो येथील वरिष्ठ न्यायालयाच्या एका न्यायाधीशावर एकंदर १९ आरोप ज्यूरीनें शाबीत केले असून त्यांपैकीं १ लक्ष डॉलर्सची लांच घेतल्याचा प्रमुख आरोप आहे." ( ता. २१–२–१९७३ )

"न्यूयॉर्क येथील १०, ११ व १२ वर्षे वयाच्या तीन मुलांना एका ७ वर्षे वयाच्या मुलीवर अत्याचार केल्याबद्दल व शेवटी तिला सहाव्या माळ्यावरून खाली फेकून देऊन ठार केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे."

( ता. २१–११–१९७२ )

अशा प्रकारच्या बातम्या प्रत्यहीं येत असतात.

हे सर्व प्रकार अत्यंत खेद व उद्वेग उत्पन्न करणारे आहेत हें प्रत्येकजण मान्य करतो. पण त्यासाठी आध्यात्मिकतेचाच एकमेव इलाज आहे, हें सांगण्याचें धैर्य विचारवंतांना होत नाहीं, कारण तसें सांगितले कीं आपण जुने ठरूं ही भीति त्यांना भेडसावीत असते.

सर्व धर्मसंस्थापकांनी आपापल्या जीवनकालांत लोकांना सत्पथावर आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला, व त्यांच्या कालापुरतें त्यांनी त्यांत यशही मिळविलें. 'साईलीले'चे ध्येयवाक्य

**जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ।।**

यांत हेंच सांगितलें आहे. बाबांनी तर अगदी अलीकडे हें लोकांना सन्मार्गावर आणण्याचे काम शिरडी क्षेत्रांत करून दाखविलें. साधुसंतच हें काम करूं शकतात, 'पुढारी' करूं शकत नाहीत, कारण, त्यांचे स्वतःचेच हात दुष्कृत्यांनी बरबटलेले आणि तोंडें खोट्या भाषणांनी विटाळलेलीं असतात. संत काहीं न बोलतां आपल्या आचरणानें व उदाहरणानें लोकांना सुधारीत असतात.

"**यत्र विश्वं भवत्येकनीडम्**" (जेथें विश्व एकाद्या घरट्याप्रमाणें वाटूं लागतें) अशा विश्वव्यापक अवस्थेला प्राचीन ऋषि पोचले होते. '**हे विश्वचि माझें घर**' असें म्हणणारे ज्ञानेश्वर महाराज किंवा आजचे विश्वकुटुंबी साईबाबा हे त्या '**कृण्वन्तो विश्वमार्यम्**' असा उद्घोष करणाऱ्या प्राचीन आर्यांचे खरे प्रतिनिधि होत. म्हणून त्यांचा उपदेश हा केवळ भारतालाच केलेला नाही, तर सबंध विश्वाला केलेला आहे परंतु आतां तो उपदेश फार जुना झाला, आजच्या काळाला तो लागू नाही असा आधुनिकांचा दावा आहे. पण अध्यात्म कधींच जुनें होत नाहीं. विज्ञान मात्र कालचें

आज व आजचें उद्या जुनें व शिळें होत असतें. परंतु अध्यात्माला जुनें समजायचें व रोज शिळ्या होणाऱ्या विज्ञानाचा उदो उदो करायचा हा या युगाचा स्वभाव होऊन बसला आहे.

आम्ही (साईभक्त) जुन्याचे समर्थक नाहीं. आम्ही आधुनिकांतले आधुनिक आहों. आधुनिक काळांत विज्ञानानें उपलब्ध झालेल्या सुखसोयी आम्ही नाकारीत नाहीं. परंतु त्यांचा उपभोग घेण्यासाठीं विशाल वृत्तीची अत्यंत आवश्यकता आहे एवढाच आमचा सिद्धांत आहे. "मी ज्यावर हात ठेवीन त्याचें भस्म व्हावें" अशी ताकद भस्मासुरानें मिळविली, पण लोकहिताची बुद्धि त्याच्याजवळ नसल्यामुळे एकदां वेडाच्या भरात त्याने स्वतःच्याच डोक्यावर हात ठेवला व स्वतःचेच भस्म करून घेतलें. अशी भीति आजच्या जगाबद्दल कित्येक थोर विचारवंतांना वाटत आहे. परंतु विज्ञानाच्या नशेने जे झिंगले आहेत ते मात्र या संभाव्य विनाशाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करतात व म्हणतात की, ज्या विज्ञानाने हल्लींचीं संहारक अस्त्रे निर्माण करण्याची बुद्धि दिली तेंच विज्ञान त्यांना आवरील. म्हणजे हवाल्याला टवाला ठेवून हे मोकळे.

आंम्ही आणखी एकदां सांगतों की आधुनिकतेशीं आमचा वाद नाहीं. ती आधुनिकता काहीही करो व कुठेही जावो. फक्त जगाने आध्यात्मिकता न सोडतां आधुनिकतेचा उपभोग घ्यावा, **राम** न सोडता '**रामा**' उपभोगावी, '**ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यांजगत्। तेन त्यक्तेनभुंजीथाः॥**' अशा वृत्तीने जगातील उपभोग्य वस्तूंचा आस्वाद घ्यावा, एवढेच आम्ही सांगत आहो.

अध्यात्म नेहमी नित्यनूतन रहाणार आहे. त्याचे बाह्य स्वरूप जगातील भौतिक परिस्थितीप्रमाणें बदलेल, परंतु त्याचे अंतःस्वरूप परमात्म्याप्रमाणें अविकारी राहील. अर्थात् अध्यात्माची दिखाऊ भाषा बदलली तरी आध्यात्मिकता अबाधित राहील, व तीच जगाला तारील.

आध्यात्मिकतेचा संदेश जगाला देण्याची ऐतिहासिक भूमिका भारताला करावयाची आहे. आम्ही साईबाबांचे अनुयायी त्याच कार्यासाठी कटिबद्ध आहोत. बाबा ते कार्य आमचेकडून करून घेवोत.

## राष्ट्रभाषेचें स्थान

एप्रिल १९७३ च्या अंकापासून साईलीलेंतील हिंदी विभाग बंद करण्यात आला कारण दोन वर्षे हा विभाग चालवूनही त्याला लेखकांचा व वाचकांचा कोठून

प्रतिसाद मिळाला नाहीं. पूर्वी मराठीचीं ३६ ते ४० पानें होत, ८ ते १२ पानें हिंदीचीं असत, ६ पानें देणगीदारांच्या याद्या व एक दोन पानें शिरडीवृत्त असे. शिवाय कधीं कधीं वृत्तविशेष. हें सर्व झाल्यावर जेमतेम वीस पानें इंग्रजी लेखांसाठीं उरत. साईलीलेच्या नवीन स्वरूपांत मराठी व इंग्रजी लेखांना प्रत्येकीं ४८ पानें मिळतील अशी व्यवस्था आहे.

परंतु हिंदी विभाग बंद झाल्यापासून, तो अजिबात बंद न करतां लहानशा प्रमाणांत तरी चालू ठेवावा, अशा वारंवार सूचना येत आहेत. तथापि स्वतंत्र हिंदी विभागाचा कांहीं उपयोग नाहीं. मात्र कांहीं हिंदी गीतें सर्व लोकांच्या नित्य पठणांत असतात, उदा. **गुरुकृपा अंजन पायो, रहम नजर करो अब मोरे साई इ.** याचें कारण हिंदी गीतांची गेयता हें होय. या दृष्टीनें एकाद दुसरी हिंदी कविता मराठी आवृत्तींत मधून मधून घालण्याचा आमचा विचार आहे. नाहींतरी नामदेव–तुकारामांपासून दासगणूंपर्यंत कित्येक मराठी संत–कवींनी हिंदी कविता केली आहे. साईबाबांचीही नित्याची भाषा उर्दूमिश्रित हिंदीच होती. या दृष्टीनें हिंदी कविता या मराठी आवृत्तीचें भूषणच ठरतील. कुंकू लहान असलें तरी त्याचें स्थान भालप्रदेशावर असून तें सौंदर्य वाढविणारें आहे, खरें ना ?

———*———

# श्रीसाई कीर्तनमाला

**पुष्प ७ वें**

**– ह. भ. प. (प्रा.) द. दि. परचुरे**

## अभंग

**(राग–तिलंग; ताल-त्रिताल; चाल–ठुमरीसारखी)**

**संतपदाची जोड दे रे हरी ।।ध्रु.।।**

**संतसमागमिं आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड ।।१।।**

**सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविति जिविचे कोड ।।२।।**

**अमृत म्हणे रे हरि ! भक्तांचा । शेवट करिसी गोड ।।३।।**

साईकीर्तनमालेचें हें सातवें आणि अखेरचें पुष्प. इतके दिवस सेवा केली म्हणून मेवा मागण्याचा अधिकार प्राप्त झाला. आमच्यातर्फे मागणारे कोण ? तर अमृत-

राय. देणारा कोण ? तर उदारांतला उदार असा श्रीहरी. आणि मागणें काय ? तर संतपदाची जोड. वा वा, कसा सुंदर त्रिवेणीसंगम जुळला आहे !

या पदांत अमृतरायांनी एक मौज केली आहे. ते संतांजवळ हरिपदाची जोड मागत नाहींत, तर हरीजवळ संतपदाची जोड मागतात. कारण कबीरांनी म्हटल्या-प्रमाणें –

**'हरिसे जनि तू हेत कर ---'** **(पुष्प पहिलें पहा)**

खरोखर मनुष्यत्व, मुमुक्षत्व व महत्संग या तीन गोष्टी दुर्लभ असून केवळ भगवत्-कृपेनेंच मिळणाऱ्या आहेत :– **दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् ।**

**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं, महापुरुषसंश्रयः ॥ – शंकराचार्य.**

नारदमुनि तर याच्याही पुढें जाऊन सांगतात कीं –

**"महत्संगस्तु दुर्लभः, अगम्यः, अमोघः च ।"** **(ना. भ. सू.)**

वसिष्ठ रामचंद्राला सांगतात कीं अध्यात्मांतलें प्रथम साधन सत्संगच होय –

**सतां संगतिरेवात्र साधनं प्रथमं स्मृतम् ।**

एकदां सत्संगति लाभली म्हणजे काय होतें हें नाथ सांगतात –

**(ओवी) करितां वरिष्ठ साधन कोडी । बोधाची जोडेना कवडी ।**
**सद्‌गुरुभजनाची अर्ध घडी । जोडी कोडी बोधाच्या ॥**

संतसंगति ही गिरणीच्या यंत्राप्रमाणें आहे. त्या यंत्राच्या एका टोंकाला सरकीयुक्त कापूस टाकतात. पण त्यावर निरनिराळे संस्कार यंत्रांत होऊन दुसऱ्या टोकाला घडी केलेलें वस्त्र बाहेर पडतें. त्या प्रमाणें अगदीं कच्चा मनुष्यही जरी सत्संगति करूं लागला तरी तो पूर्ण होऊन निवतो. कोणत्याही संगानें ममत्व व त्यामुळें बंधन निर्माण होतें. संसाररूपी अश्वत्थावें निर्मूलन केवळ असंगानेंच होतें असें भगवंतांनी सांगितलें आहे –

**अश्वत्थमेनं सुविरूढमूलं असंगशस्त्रेण दृढेन छित्वा ।** **भ. गी. १५।३**

परंतु संग सर्वथा टाळणें शक्य नाहीं. आपली इच्छा असो वा नसो. आपला कोणाशीं तरी संग घडणारच. मग तो सज्जनांशीं तरी करावा. कवि म्हणतात –

**त्याज्यः सर्वात्मना संगः, स चेत् त्यक्तुं न शक्यते ।**
**सद्भिः सह स कर्तव्यः, सन्तः दुःसंगभेषजम् ॥**

पंत देखील आपल्या प्रसिद्ध केकावलींत अशी इच्छा प्रकट करतात कीं **'सुसंगति सदा घडो,'** पण त्याचबरोबर **'कुजनविघ्न बाधा टळो.'**

मूळ पदांत अमृतरायांनी सांगितलें आहे कीं '**संतसमागमिं आत्मत्वाचा । सुंदर उगवे मोड ।**' ज्ञानोबारायांनी म्हटलें आहे "**आत्मज्ञानीं चोखडीं । संत हीं माझींच रुपडीं ॥**" म्हणजेच '**तुका म्हणे सांगों किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥**' म्हणून स्वत: भगवंतालाच मुळी आपल्या पूजेपेक्षाही संतांची पूजा अधिक आवडते. त्यांचा मान राहावा, त्यांची कीर्ति वाढावी यासाठीं भगवंत झटतात. श्रीकृष्णांनी भारतीय युद्धाच्या प्रारंभी प्रतिज्ञा केली होती कीं '**न धरीं शस्त्र करीं मी, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार.**' तरी, भीष्म इच्छामरणी आहेत हें माहीत असतांही, भगवान सुदर्शन चक्र घेऊन भीष्मावर धांवले. भीष्मांनी तर भगवंताचें आनंदानें स्वागत केलें व म्हटलें, 'ये, ये पुरुषोत्तमा. तुझ्या हातून मरण आलें तर मी तें माझें महद्भाग्यच समजेन.' त्या प्रसंगानें भक्तश्रेष्ठ भीष्मांचें यश अधिकच उजळून निघालें.

साधुसंतांबद्दल भगवंतांची काय भावना असते याचें गोड वर्णन नाथांनी केलें आहे –

**"सिद्ध करून पूजा संभार । माझे पूजेचा अत्यादर ।**
**पूजा करितां एकाग्र । जैं साधुनर घरा येती ॥**
**त्या साधूंची पूजा न करितां । जो माझी पूजा करी सर्वथा ।**
**तेणें मज हाणितल्या लाथा । कीं तो माझ्या घाता प्रवर्तला ॥"**

पहा. यापेक्षा आणखी काय सांगायचे ? भगवंत पुढे म्हणतात, 'गोकुळांतल्या चरित्रावरून मला सगळ्यांनी बदनाम केलेंच आहे. तेव्हां मला कांहीं चाड (अब्रू) राहिलेलीच नाहीं. पण या संतांची मात्र चाड राहिली पाहिजे म्हणून मी फार जपतों –

**"संत माझे लळेवाड । त्यांची पूजा मज लागे गोड ।**
**संतसेवकांचें मी पुरवीं कोड । मज निचाडा चाड संतांची ॥**
**सोडूनि माझें पूजाध्यान । जो संतांसी घाली लोटांगण ।**
**कोटि यज्ञांचें फळ जाण । मदर्पण केलें त्यानें ॥**
**सकल तीर्थीं तोचि न्हाला । जपतपाचीं फळें तोचि लाहिला ।**
**सर्व पूजांचें सार तो पावला । जेणें साधु वंदिला सन्मानें ॥"**

याचें कारण काय ? तर

**प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ति संत माझ्या सचेतन मूर्ति ।**
**दृढ भावें केल्या त्यांची भक्ती । ते मज निश्चितीं पावली ॥**
**केल्या प्रतिमा निजकल्पना उत्तम । संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम ।**
**चालतें बोलतें परब्रह्म । अति उत्तम साधुसेवा ॥** (ए भा. अ. ११)

'नामचिंतामणि'कार श्री. कामत लिहितात – सूर्यकिरणांत अग्नितत्व ओतप्रोत भरलेलें असतें, पण अन्न शिजविण्यास किंवा होमास त्यांतील अग्नीचा उपयोग नसतो. सूर्यकांत भिंगाचे ठिकाणीं मात्र ते किरण 'एका केंद्रात' आणून त्यांपासून अग्नि उत्पन्न करतां येतो. तसें संतांचें हृदय हें सूर्यकांत भिंगासारखे असतें. म्हणून तुकाराम महाराज देवाला विचारतात "अरे, साधूच्या वशिल्याशिवाय तूं आजपर्यंत कोणाचा उद्धार केला आहेस ? एकतरी उदाहरण दाखवून दे. तेव्हां तुझी संगत नसली तरी चालेल. पण तुझ्या प्रेमळ संतांची संगत मात्र अवश्य दे.

अखंड जयां तुझी प्रीती । मज दे तयांची संगती ॥
मग मी कमलापती । तुज बा नाणीं कांटाळा ॥

'सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविति जिविंचे कोड ।' म्हणजे कांहीं पुत्र–कलत्र–वित्त मिळवून देतात असें नव्हे, तर वृत्तीला आत्मस्वरूपांत नेऊन निजानंद प्राप्त करून देतात. माऊलीने म्हटलें आहे "निजानंद हें पै ब्रह्म । ऐसें जाणती योगी वर्म ॥" तसेंच "तदनुत्तमं, अनुपमं, नित्यं, निरतिशयं, साधनानपेक्षं, अयत्नसिद्धं, अक्षयं, आत्मभूतं, आत्मैकवेद्यं ब्राह्मं सुखमुपैति ।" (भ. गी. शंकरानंदी टीका) साधूंचें कार्यच हें आहे.

बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणोनियां॥ (तुकाराम)
असा त्यांचा स्वभावच असतो.

जगा लावावें सत्पथीं । हेचि साधूची पैं कृती ॥
एका जनार्दनीं साधु । हृदयीं वसे ब्रह्मानंदु ॥

वास्तविक" हित आहे देहातीत । म्हणोनि निरोपिती संत ॥" –समर्थ, देहातीत म्हणजेच अतींद्रिय. असें सुख हें सहजासहजीं प्राप्त होणारें नव्हे. साधूंचें मात्र तें सहज लक्षण होय. "येरवीं अभ्यास करितां । हातीं न चढती तत्वतां ॥"
परंतु समर्थ सांगतात कीं

"अभ्यासाचा मुकुटमणी । वृत्ति राहावी निर्गुणीं ॥
संतसंगें निरूपणीं ॥ स्थिती बाणे ॥
सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणांचें ॥ (दासबोध ८।१०)

साक्षात्कारी सत्पुरुष म्हणजेच साधु किंवा संत. यांचीं लक्षणें समर्थ सांगतात
जाणावा तो साधु पूर्ण जया बोधु । भूतांचा विरोधु जेथ नाहीं ॥१॥
कल्पनेचा देहो त्या नाहीं संदेहो । सदा निःसंदेहो देहातीत ॥२॥
जया नाहीं क्रोध जया नाहीं खेद । जया नाहीं बोध कांचनाचा ॥३॥
रामदास म्हणे साधूंचीं लक्षणें । अति सुलक्षणें अभ्यासावीं ॥४॥

फूल मातींत पडलें तर फुलाचा वास मातीला लागतो; मातीचा वास कांहीं फुलाला लागत नाहीं. तसेंच दुर्जन साधूंच्या संगतींत सुधारतात. गंगेला ओहोळ मिळतांच तो गंगारूप होतो. एका कवीनें फार सुंदर उदाहरण दिलें आहे —

**असज्जनः सज्जनसंगयोगात् करोति दुःसाध्यमपीह साध्यम् ।**
**पुष्पाश्रयात् शंभुजटाधिरूढा पिपीलिका चुंबति चंद्रबिंबम् ।।**

समर्थ म्हणतात :—

**मना सर्व हा संग सोडोनि द्यावा । अती आदरें सज्जनांचा करावा ।**
**जयांचेनि संगें महादुःख भंगे । जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ।।**
**मना संग हा सर्व संगांसि तोडी । मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी ।**
**मना संग हा साधकां शीघ्र सोडी । मना संग हा द्वैत निःशेष मोडी ।।**

संतांचा हा महिमा संतच जाणूं शकतात व अधिकारवाणीनें सांगूं शकतात. स्वतः नाथांना जनार्दनस्वामींची संगति लाभली होती. म्हणून ते स्वानुभवानें सांगतात—

(अभंग) **संत जाती हरिकीर्तना । त्यांचे वाहिन मोचे वहाणा ।।१।।**
**हेंचि भवसिंधूचें तारूं । येणें उतरूं पैलपारू ।।२।।**
**जन्मोजन्मींचे भेषज । ते हें संतचरणरज ।।३।।**
**संतचरणींच्या पादुका । जाला जनार्दनीं एका ।।४।।**

बाबांच्या संगतींत अगदीं असाच अनुभव सर्वांना आला. श्रीहरीच अशा भक्तांचा गोड शेवट करतो. तसें बाबांचें झालें. संतांचा देवाजवळ तो एक हट्टच असतो —

" **याचसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दीस गोड व्हावा ।।** " (तुका.)

आणि भगवान् सांगतात कीं माझ्यावरचें भक्तांचें भक्तिरूपी ऋण फेडण्यासाठीं त्यांच्या अंतकाळीं मला त्यांची सेवा करावीच लागते —

**तें ऋणवैपण देखोनि अंगीं । मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं ।**
**भक्तांचिया तनुत्यागीं । परिचर्या करीं ।।** (ज्ञा. ८।१३१)

संतांना लाभलेलें हें जें 'देणें ईश्वराचें' तें संत आपल्या भक्तांना मुक्तहस्तानें देतात. अशा संतांच्या पायांची जोड लाभली म्हणजे काय होतें हें केशवस्वामी सांगतात —

**निरंजनीं अक्षयीं निद्रा केली हो । तेणें माझी सर्वही चिंता गेली हो ।।**
**सुखशयनीं सर्वदा निरालंबी हो । माझें मीपण बुडालें आत्मबिंबीं हो ।**

एवढ्यासाठीं अमृतराय प्रथम पद्यांत सांगतात —

**संतपदाची जोड । दे रे हरी संतपदाची जोड ।।**

(या सातव्या व शेवटच्या कीर्तनाच्या उत्तररंगांत बाबांच्या समाधीची संपूर्ण हकीकत व बाबांच्या शिकवणीचें थोडक्यात सार येणार आहे. या वर्षीं बाबांचा समाधिदिन (दसरा) ६ ऑक्टोबरला येत आहे. म्हणून हा कथाभाग ऑक्टोबर अंकांत देण्यांत येईल.)

# श्री गोंदवलेकर महाराज

## [ व्यक्तिदर्शन ] लेखांक ६ वा

### पु. मु. अत्रे

## वासुदेव बळवंतांशीं भेट

सन १८७६–७७ सालीं भारतांत दुष्काळाचा कहर माजला होता. या हाहाःकारानें श्रीमहाराजांचें अंतःकरण अगदीं पिळवटून गेलें होतें. तेव्हां त्यांनीं विचार केला कीं आपण कांहींतरी काम काढून भुकेनें कोळ झालेल्या लोकांच्या तोंडांत चार घास घालावेत. एका शेतांतील माती दुसऱ्या कातळ जमिनींत टाकावयाची हें काम त्यांनीं काढलें. दीडशें बैलगाड्या व दीड हजार माणसें कामावर लावून त्यावर ते स्वतः देखरेख करूं लागले. आपलीं सगळीं धान्याचीं बळदें उघडून, घरची मंडळी व गांवांतल्या कांहीं बायका मिळून भाकरी करण्याचें काम सुरू झालें. यावर सरस्वती देखरेख ठेऊं लागली. एक मोठी–जाड भाकरी आणि एक वाटी आमटी प्रत्येकाला मिळे. एक दिवस औंधचा राजा गोंदवल्यावरून जातांना त्यानें हें पाहिलें. श्रीमहाराज शेतांतच होते. राजाला फार धन्यता वाटली व तो त्यांचें दर्शन घेऊन गेला. या काळांतच वासुदेव बळवंत फडके या क्रांतिवीरानें इंग्रजांचें जुलमी जोखड झुगारून देण्याचा निश्चय करून युद्धाची जैय्यत तयारी केली होती. हे एक थोर साधक व श्रीदत्ताचे आर्त भक्त होते. म्हणून युद्धाची नौबत झडण्यापूर्वी आपल्या कार्याला निश्चित यशाचा आशीर्वाद मिळण्यासाठीं आपण त्रिकालज्ञ विभूतींचे आशीर्वाद घ्यावेत अशी निष्ठा ठेऊन प्रथम ते गाणगापूरला श्रीनृसिंह–सरस्वतींकडे व हुमणाबादला श्रीमाणिकप्रभूंकडे दर्शनास गेले. दोन्हीकडे आशीर्वाद मिळाला नाहीं म्हणून ते अक्कलकोटला श्रीस्वामी समर्थांकडे आपली तलवार घेऊन गेले. स्वामींनीं एका सेवेकऱ्याकडून ती झाडाला टांगून दिली. वासुदेव बळवंतांनीं आशनें पुष्कळ वाट पाहिली व शवटीं कंटाळून त्यांनींच ती झाडावरून काढली व पुण्यास निघून गेले. तेथें श्रीकाळबोवांचे दर्शन करून त्यांचा आशीर्वाद मागितला. ते म्हणाले, "हेतु स्तुत्य आहे पण हट्टाला पेटून भिंतीवर डोकें आपटूं नकोस व फुकट प्राण देऊं नकोस." अखेरीस ते गोंदवल्यास श्रीमहाराजांकडे आले. त्यांच्या महान् स्वार्थत्यागाची व भारताच्या अभ्युदयाच्या कळकळीची कीर्ति वासुदेव बळवंतांना पूर्णपणें माहीत होती. रात्रीं सर्व मंडळी झोंपल्यावर एका निवांत खोलींत दोघांची सबंध रात्रभर चर्चा चालू होती. "कार्याला सध्या अनुकूल संधि नाहीं, थोडें थांबलें पाहिजे" हें वासुदेव बळवंतांना पटवून देण्याची श्रीमहाराजांनीं पराकाष्ठा केली. पण व्यर्थ. उलट ते जास्तच संतापले व म्हणाले, "तुम्ही रामदास आहांत. मी शिवाजी होतों.

माझ्या तळमळीस आपला आशीर्वाद व सक्रिय प्रोत्साहन लाभावें." श्रीमहाराज म्हणाले, "मी रामदास होणें शक्य नाहीं. तुम्हीही शिवाजी नाहींत याची खात्री बाळगा व या काळांत अशा कार्यासाठीं आपली शक्ति व्यर्थ दवडूं नका. तुम्ही भगवंताची उपासना वाढवा म्हणजे तुमच्या कार्याला जोर येईल." "अहा रे साधु !" असें चिडून म्हणत व हात ओवाळीत वासुदेव बळवंत तडक पुण्यास चालते झाले व त्यांनीं युद्धाची तुतारी वाजवली. सन १८७९ च्या जुलै महिन्यांत सरकारनें विश्वासघातानें त्यांना कैद केलें त्यावेळीं श्रीमहाराज इतकेंच बोलले, "अरेरे, आपल्यातल्या एका चांगल्या माणसाचा घात झाला. भगवंतानें यापुढें त्यांचे फार हाल करूं नयेत." सन १८८३ सालीं ते एडनच्या तुरुंगांतच वारले.

## पत्नीचा वियोग

याच सुमारास सरस्वतीला दिवस राहिले. याचा खरा आनंद गीतामाईंना झाला. त्यांनीं आपल्या सुनेचे डोहाळे अनेक प्रकारांनीं पुरविले. पूर्ण दिवसांनीं ती बाळंत होऊन मुलगा झाला. हुबेहुब तो श्रीमहाराजांच्या सारखा दिसत असे. त्यामुळें गीतामाईंना आपल्या मुलाची दुपटचांतली आठवण येई. मोठ्या थाटानें नातवाचें बारसें करण्याचा आजोबा-आजी व इतर सगळचांनी घाट घातला होता, पण एकटचा श्रीमहाराजांनीं तें लांबणीवर टाकलें. याचें गांवच्या लोकांस सुद्धां फार आश्चर्य वाटलें. सरस्वतीबाई मात्र भवितव्यता पूर्ण ओळखून होत्या. एक वर्षाच्या आंतच सोनुला परलोकी गेला ! नंतर थोडचा दिवसां ीं सरस्वतीबाईना ताप येऊ लागला. तसा ताप कांहीं विशेष नव्हता, पण श्रीमहाराजांनीं त्यांना अंतकाळ समीप आला आहे असें मोठ्या खुबीने सुचविलें. या प्रसंगास सहजवृत्तीनें झेलण्याइतकें उपासनेचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं खास होतें. अंतकाळच्या दिवशीं त्यांनीं आपल्याला स्नान घालण्यास सांगितलें, विठोबा-रखुमाईच्या चरणांवर मस्तक टेकलें, सासू-सासऱ्यांना नमस्कार केला, पतिचरणाचें तीर्थ घेतलें, नमस्कार केला व सिद्धासन घालून रामनाम घेत घेत आपले प्राण चिच्छक्तींत विलीन केले. "तिच्या आत्म्याला चांगली गति मिळेल" येवढेंच श्रीमहाराज उद्गारले.

## वडिलांचा वैकुंठवास व दुसरा विवाह

जिजीबाई इंदूरला फार आजारी आहे असें कळल्यावर श्रीमहाराज तिकडे गेले व एके दिवशीं दुपारीं चार वाजतां विचित्रपणें क्षौर करवून आले. सगळचांना याचें फार आश्चर्य वाटलें व त्यांनीं कारण विचारतां श्रीमहाराज निर्विकारपणें बोलले, "आज आमचे वडील वैकुंठवासी झाले." बरोबर दहाव्या दिवशीं महाराज गोंदवल्यास सकाळींच दत्त उभे राहिले. त्यांनी वडिलांचें उत्तरीय विधि यथासांग पार पडले व आईची शोकार्त स्थिति सांत्वनपर शब्दांनीं बरीच हलकी केली. यावेळीं

त्यांचें वय ३०–३२ असावें. त्या काळच्या रिवाजाप्रमाणें ३–४ महिन्यांनीं श्रीमहाराजांना मुली सांगून येऊं लागल्या, पण कोणतेंतरी निमित्त पुढें करून ते टाळाटाळ करीत होते. शेवटीं एक दिवस आई त्यांना म्हणाली, "अरे गणू ! अजून तुझें लग्नाचे वय आहे आणि तूं लग्न करावेस अशी माझी इच्छा आहे; तेव्हां नाहीं म्हणू नकोस." श्रीमहाराज म्हणाले, "आई, मी तुझें एका अटीवर ऐकेन. मुलगी मी स्वत: पसंत करीन." आईनें ही अट मान्य केली. एक दिवस ते आटपाडीला सखारामपंत देशपांडे यांचे घरीं गेले. असे अचानक श्रीमहाराज इतक्या लांबून आलेले पाहून सखारामपंतांना आश्चर्य व कौतुकही वाटलें. श्रीमहाराज म्हणाले, "तुमच्याकडे लग्नाच्या मुली आहेत असें कळलें, व आमच्यापैकीं एकाला लग्न करावयाचे आहे म्हणून मी मुली पहायला आलों आहें." हें ऐकून तर सखारामपंत विस्मयानें भरून गेले. कारण ते सुखवस्तु असूनही त्यांच्या पांच मुलींचीं लग्नें आणि त्यांतच एका जन्मांध असलेल्या मुलीस कसें उजवावें या विचारांनीं ते नेहमीं खिन्न असत. त्यांनीं आपल्या सगळ्या मुलींना बैठकींत बोलावलें, परंतु त्यांत अंध मुलगी नव्हती. श्रीमहाराज म्हणाले, "मी असें ऐकतों कीं आपणांस एक अंध मुलगी आहे, तिला बोलावा." हें ऐकून तर सखारामपंतांचें आश्चर्य शिगेस पोंचलें. त्या मुलीला पाहून श्रीमहाराजांनीं पसंती दर्शविली व खुलासा केला कीं, "मी स्वत:च लग्न करणार आहे आणि हीच मुलगी मला पसंत आहे. पण मी हा असा गोसावी ! तेव्हां प्रथमच नीट विचार करून मला काय तें सांगा." आपल्या आंधळ्या मुलीस स्वत: श्रीमहाराज मागणी घालीत आहेत, तेव्हां ही देवाचीच कृपा आहे असें पक्कें समजून त्यांनीं लगेच संमति दिली. घरीं आल्यावर लग्न ठरवून आल्याचें श्रीमहाराजांनी आईला सांगितलें. त्यांना फार बरें वाटलें. पुढें महाराज मुहूर्तच्या तिथीस आपण एकटेच आटपाडीस जाऊन व लग्न करून बायकोला घेऊन घरीं आले. सासूबाईना नमस्कार करण्यासाठीं बायकोला आईच्या पुढें नेली व म्हटलें, "आई, ही बघ तुला नवीन सून आणली आहे. ही इतकी मर्यादशील व गरीब स्वभावाची आहे कीं, डोळा वर करून तुझ्याकडे कधीं बघणार देखील नाहीं." आईनें मुलीच्या तोंडाकडे पाहिलें आणि आपल्या कपाळाला हात लावून म्हटलें, "गणू, आतां हंसावें कीं रडावें हेंच मला कळत नाहीं ! बाबा, तूं केव्हां काय करशील याचा मुळी नेमच नाहीं ! बरें, आतां झालें तें झालें !" मुलीचें माहेरचें 'यमुना' हें नांव बदलून 'सरस्वती' असेंच ठेवलें व आईनें सुनेच्या तोंडांत साखर घातली. सर्व मंडळी तिला 'आईसाहेब' म्हणू लागले.

## ब्रह्महत्या घडली असती ना !

हें दुसरें लग्न झाल्यावर श्रीमहाराज गोंदवल्यास सहा महिने राहिले. एकदा दिवेलागणीला महाराज मंडळींत बसून गप्पा मारीत होते. इतक्यांत एकजण हळूच

मागच्या माळवदावर चढला व त्यानें एक भला मोठा धोंडा श्रीमहाराजांच्या डोक्यावर पडेल अशा बेतानें खालीं ढकलला. आवाज आला म्हणून महाराजांनी वर पाहिलें व निमिषांत ते बाजूस सरकले. घरीं येऊन त्यांनी झालेली हकीकत आईला सांगितली. तिनें आधीं त्यांची दृष्ट काढली व म्हटलें. "गणू, देवाची कृपा म्हणून तूं वांचलास. नाहींतर माझ्यावर केवढा घोर ओढवला असता !" श्रीमहाराज म्हणाले, "आई, असेंच केवळ नाहीं कांहीं. देवाच्या मनांत नसलें तरी मी मरूं शकतों. मला मरणाची विद्या चांगली येते !"

पुढें ८–१५ दिवस गेल्यावर एकदां श्रीमहाराज आईला म्हणाले, "आई, आज माझें पोट फार दुखतं आहे." आईनें किती इलाज केले तरी पोट थांबेना. उलट तें जास्तच फुगूं लागलें. पहाटे तर महाराजांची नाडीही सुटत चालली. तासाभरानें मंडळी पुढच्या तयारीस देखील लागली. ताटी बांधायला सुरुवात करणार इतक्यांत श्रीमहाराजांचा उजवा हात हालला. तेव्हां मंडळी ताटी सोडून वरचेवर नाडी दाबून पाहूं लागली तों हळू हळू अंगांत उष्णता लागूं लागली. जराशानें श्रीमहाराज उठून सुद्धां बसले व हंसून आईला म्हणाले, "आई, अग, मी कांहीं मेलों नव्हतों. तुला फक्त मरणाची विद्या दाखविली इतकेंच !"

## पंढरपूरची एकादशी

लिंगोपंतांच्या वेळेपासून इनामदारांची मंडळी वारीला अप्पासाहेब भडगांवकर यांच्या घरीं उतरत असत. येरवीं सुद्धां श्रीमहाराज त्यांचेकडे वरचेवर जात. त्यांच्या-पैकीं एकजण समवयस्क असल्यामुळें तो त्यांची थट्टा करून म्हणे, "काय रे गणू, तूं मारे लंगोटी लावून येवढें काय साधलें आहेस ? आम्हाला प्रपंचांत सुद्धां काय कमी सुख आहे ?" तेव्हां श्रीमहाराज त्याला उलट टोला मारीत, "हें बघ, दारूच्या धुंदींत असलेला भिकारी देखील स्वतःला राजा म्हणतो. पण तो असतो गटारांत लोळत पडलेला. तशी तुझी अवस्था आहे." एका कार्तिकीला श्रीमहाराज १०–१२ दिवस आधींच आले तों भडगांवकरांचा एकुलता एक मुलगा विषमज्वरानें अंथरुणावर तळमळत पडलेला दिसला. श्रीमहाराज रात्रंदिवस त्याच्याजवळ बसून औषधपाणी करीत होते व आईबापांना धीर देत होते. मुलगा तापाच्या फणकाऱ्यांतसुद्धां नामस्मरण करीत होता. तापाच्या २० व्या दिवशी मुलाचा जीव फारच तळमळूं लागला. तेव्हां श्रीमहाराजांनीं त्याला मांडीवर घेतलें. त्याबरोबर तो एकदम शांत झाला व प्रसन्न मुद्रेनें त्यानें प्राण सोडला. आईबापांच्या शोकाला पारावार उरला नाहीं. तरीही त्यांचे सांत्वन करण्यास श्रीमहाराज समर्थ झाले. बैरागी होऊन काय साधतां येतें याचें प्रत्यंतर त्या रात्रीं सर्वांना कळून चुकलें आणि आप्पासाहेबांनीं तर आपलें सर्वस्व श्रीमहाराजांना वाहिलें.

## पनवेलचे सदूभाऊ लेले :

श्रीमहाराज बैराग्याच्या वेषांत असतांना इंदूरहून गोंदवल्यास येतेवेळीं त्यांनीं पश्चिम भारतांतील तीर्थक्षेत्रेंही पाहिलीं होतीं. त्यांत त्यांचा पनवेलीस गांवाच्या मंदिरांत मुक्काम पडला. गावांतील जी मंडळी दर्शन घेऊन गेली त्यांमध्ये सदूभाऊ लेले यांची एकरत भक्ति पाहून श्रीमहाराजांनी त्यांना एक सुंदर शाळिग्राम दिला व त्याची उपासना समजाऊन सांगितली. पुढें सदूभाऊंनी त्यांना सोन्याच्या पत्र्यानें मढविलेला कमंडलू अर्पण केला. परंतु त्यांनी तो त्यांच्या समोर फोडून म्हटलें, "काय रे, या तुंब्याचा लोभ दाखवून तूं मला ठेऊन घेणार काय ? पण मला याची किंमत किती आहे हें कळलें ना ?" असें बोलून ते तडक निघून गेले.

पुढच्या एका मुक्कामांत सदूभाऊंची आई श्रीमहाराजांना म्हणाली, "महाराज, मी आतां ७५ वर्षांची थकली–भागली आहें. तेव्हां मनांत अशी इच्छा आहे कीं आपल्या मांडीवर मरण यावें." श्रीमहाराज म्हणाले, "मग त्याला वेळ कशाला ? चला, आजच निघा." त्यावर आई व मुलगा दोघेही गडबडलीं. आई म्हणाली, "महाराज, अगदीं आत्तांच कांहीं नको हो. पण माझ्या मनचें मी बोलून दाखवलें इतकेंच." सर्व मंडळी खोखो हंसली. पण महाराजांनी आश्वासन दिलें, "माय, तुमच्या अंतकाळजी तुम्ही काळजी करूं नका. आजपासून अखंड नामस्मरण करा, श्रीमारुतिराय स्वतः तुम्हाला नेतील."

## भिल्लांच्या टोळींत

पनवेलहून श्रीमहाराज उत्तरेकडे निघाले. अबूच्या जंगलांतून जात असतां एका भिल्लाच्या टोळीनें त्यांना गांठलें व त्यांना घेऊन ते आपल्या निवासस्थानाकडे आले. एका म्हाताऱ्या भिल्लानें श्रीमहाराजांच्या जेवणाची चौकशी केली. ते म्हणाले, "मी कांहीं खात नाहीं, फक्त दूध पितों." तेव्हां त्या भिल्लानें आपल्या मुलाला दूध आणण्यास सांगितलें. या नव्या सावजाची जरा मजा बघावी असें योजून त्यानें एक मारकी व पारठी गाय आणली व पाहुण्यास म्हटलें, "या गाईची धार काढून दूध प्या." श्रीमहाराज गाईजवळ आले व तिच्या पाठीवर थाप मारून म्हणाले, "माय, मला फार भूक लागली आहे तर पोटभर दूध दे." अंगाला हात लागल्या बरोबर गाय त्यांना चाटूं लागली व आचळांतून दूध टिपकूं लागलें. अगदीं दुधाळ गाईप्रमाणें तिनें दूध दिले ! श्रीमहाराज तें पोटभर प्याले. हा चमत्कार पाहून सगळे भिल्ल गार झाले. म्हाताऱ्या भिल्लानें सर्वांच्या वतीनें क्षमा मागितल्यावर त्यांनीं सर्वांना अनुग्रह दिला व डाके-मारींतून परावृत्त केलें.

## नागपाश :

पुढें श्रीमहाराज नर्मदेच्या कांठानें जाऊं लागले. महेश्वर गांवीं दोन जबरदस्त मांत्रिक राहात होते. श्रीमहाराजांचें आगळें तेज पाहून त्यांना वाटलें, ह्याच्याजवळ आपल्यापेक्षां प्रभावी मंत्रसिद्धि आहे आणि जर ती आपल्याला मिळाली तर आपलें महत्त्व जगांत वाढेल. म्हणून त्यांनीं श्रीमहाराजांना सिद्धि देण्याची गळ घातली. ते शांतपणें म्हणाले, " मला मंत्रतंत्र कांहीं येत नाहीं. मी रामाचा दीन दास आहें. मी फक्त रामनाम घेतों." मांत्रिक म्हणाले, " जर तुम्ही भलेपणानें आम्हाला सिद्धि दिली नाहीं तर आम्ही नागपाशानें तुम्हाला बांधून टाकूं व निष्कारण तुम्ही प्राणास मुकाल." डोंगरावर आल्यावर त्यांनीं पुन्हां श्रीमहाराजांना विचारलें व हे वळत नाहींत असें जाणून त्यांनीं नागपाशाचा मंत्र म्हटला. क्षणांत भयंकर नाग फूत्कार करीत आले व त्यांनीं श्रीमहाराजांचे अंगास विळखा घातला. मांत्रिक म्हणाले, "अजून तरी ताठरपणा सोडून आम्हाला मंत्र द्याल तर हे नाग आम्ही घालवून टाकूं. नाहींतर तुमचा प्राण जाईल." श्रीमहाराज म्हणाले, " मला संभाळणारा माझा राम समर्थ आहे, पण मी न मरतां जर हे तुमचे नाग मेले तर मात्र तुमच्या मंत्राची व तुमची भयंकर हानि होणार आहे." मांत्रिकांनीं पाश आवळण्यास सुरवात केली, पण श्रीमहाराज डोळे झांकून रामनाम घेत स्वस्थ बसून राहिले. अशा स्थितींत तीन अहोरात्री गेल्या तरी मांत्रिकांना उपरति होईना. तेव्हां श्रीमहाराज करकचून नाड्या आवळलेल्या स्थितींत उठले, कड्याजवळ चालत गेले आणि ' जय जय श्री रघुवीर समर्थ ' म्हणून धाडकन् उडी ठोकली. त्याबरोबर सर्व नाग छिन्नविछिन्न होऊन श्रीमहाराज मोकळे झाले. तीन दिवस प्राणांतिक सर्पबंधन सोसणारा व आपलें मंत्र सामर्थ्य लयास घालविणारा हा पुरुष थोर विभूति आहे असा त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला व मंत्राचा गर्व पूर्ण उतरून ते श्रीमहाराजांना शरण आले. श्रीमहाराजांनी त्यांना रामनामाचा अनुग्रह दिला, एकाला तपश्चर्येस नर्मदातीरीं बसविलें व दुसऱ्या सच्चिदानंदाला आपल्या बरोबर घेऊन ते पुढें निघाले. उज्जैनला जाण्यासाठीं श्रीमहाराज बुदनी स्टेशनवर आले. गाडीला बराच अवकाश होता म्हणून ते जवळच्या धर्मशाळेंत बसले. गाडी अपेक्षेपेक्षां लौकर आली व श्रीमहाराज स्टेशनांत पोंचण्यापूर्वींच गाडीनें शिट्टी दिली. ती ऐकून सच्चिदानंदाला राग आला व तो म्हणाला, "अबे ए लौंडी ! मेरे सद्‌गुरुको छोडकर क्यों जा रही ? जरासी ठहर." त्याबरोबर गाडी पुढें सरकेना. ड्रायव्हरनें पुष्कळ खटपट करून पाहिली, पण व्यर्थ. इतक्यांत श्रीमहाराज स्टेशनमध्यें आले व तो प्रकार पाहून ते सच्चिदानंदाला म्हणाले, "अरे, साधनाचें सामर्थ्य जरा कुठें येत आहे तोंच त्याचा व्यय अशा क्षुल्लक बाबतींत करण्याची अवदसा तुला कां आठवली ? आपण बैरागी, आपल्याला कुठें जाण्याची निकड होती ? उद्यां गेलों असतों ! पण तुझी तामसी ऊर्मि अजून कायम आहे ! जा, येथूनच परत जा. बारा वर्षे एकांतांत नामाचा अभ्यास कर व मग मला तोंड

दाखव. जा. राम तुझे कल्याण करील." ही आज्ञा ऐकून सच्चिदानंदाच्या हृदयाचें पाणी झालें. त्यानें श्रीमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवलें आणि तोंड फिरवून तो निघून गेला. बारा वर्षांनीं तो त्यांना काशीला भेटला.

## उज्जैनमधील वास्तव्य :

उज्जयिनीस सर्व पूर्वपरिचित जमा झाले. जेथें श्रीमहाराज उतरले होते तेथें नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन व अन्नदानाचा धडाका सुरू झाला. रोज एकाकडे प्रसादाचें आमंत्रण असे व श्रीमहाराज मंडळीसह जात. श्रीसमर्थांचें प्रेम असणारा एक मोठा सरकारी अधिकारी होता. आपल्या कसोटीस उतरल्याशिवाय इतरांप्रमाणें अंधभक्तीनें साधु म्हणून महाराजांच्या नादीं लागावयाचें नाहीं असा त्यानें पण केला होता. त्याचा एकुलता एक मोठा मुलगा विषमानें अत्यवस्थ असतांनाच ह्या गृहस्थानें मंडळीसह श्रीमहाराजांना प्रसादाचें आमंत्रण दिलें. श्रीमहाराज म्हणाले, "कशाला आपण येवढे कष्ट घेतां ? माझ्या बरोबर पन्नास मंडळी आहेत !" तेव्हां ते अधिकारी म्हणाले, "महाराज, आपण आपल्या शिष्यांकडे कांहींही विकल्प न काढतां जातां, परंतु मी वयस्थ असल्यामुळें माझा अव्हेर करतां हें माझें दुर्दैव म्हणायचें !" या शब्दांनीं श्रीमहाराजांना फार वाईट वाटलें व त्यांनीं आमंत्रण स्वीकारलें. रावसाहेब घरीं आले त्यावेळीं मुलाची नाडी सुटली होती व पहाटे तो गेलाही. प्रेत घरांत ठेऊन उदयीक प्रसादाची तयारी झाली. श्रीमहाराज मंडळीसह सुमारें ११ वाजतां आले. सर्वांचें आदरातिथ्य करून मंडळी पानावर बसली. आतां संकल्प सोडणार इतक्यांत मुलाचें प्रेत त्याच्या आईनें श्रीमहाराजांच्या पुढें भर पंक्तींत आणून ठेवलें व आक्रोशत ती म्हणाली, "महाराज, माझा बाळ पहाटेच आम्हाला सोडून गेला ! त्याला टाकून आपण कसे जेवतां ?" श्रीमहाराजांनीं मुलाला मांडीवर घेऊन त्याच्या छातीस हात लावला व ते म्हणाले, "माय ! मुलाच्या अंगांत अजून उष्णता आहे. तो गेला नाही. थोडा धीर धरून शांत रहा. माळा चाटविली म्हणजे तो सावध होईल." लगेच स्वतः श्रीमहाराजांनीं माळा चाटविली, देवाचें तीर्थ दिलें व अंगारा लावला. मुलाच्या अंगांत उष्णता वाढूं लागली तेव्हां श्रीमहाराजांनीं तीनदां त्याला 'बाळ' म्हणून हाक मारली. तिसऱ्या हाकेस त्यानें डोळे उघडून थोडी हालचाल केली. रावसाहेबांनीं श्रीमहाराजांचे पायांवर लोटांगण घालून ते अश्रूंनी धुतले व म्हणाले, "महाराज, आपण साक्षात् समर्थ आहांत ! या दीनाला पदरांत घ्या !" श्रीमहाराजांनी त्यांना प्रेमानें उचलून म्हटलें, "आजपासून आपण समर्थांचे झालांत. येत्या रामनवमीस तुम्ही सर्वजण सज्जनगडाला दर्शनास जा. ज्या रामरायानें मुलाला परत आणलें त्याचें नाम सतत घेत जा. राम तुमचें कल्याण करील." रावसाहेब पुढें मोठ्या पारमार्थिक योग्यतेला पोंहोचले.

# श्री चैतन्यमहाप्रभु

भक्तिमार्गाची भावमधुर गंगा

-- दिवाकर अनंत घैसास.

( उत्तरार्ध )

## वैष्णव धर्माचा प्रसार

चैतन्यानी इतक्या अल्पवयात गृहस्थाश्रमातील सौख्ये, कर्मठ आणि अभिमानी पंडितांचा दुर्दमनीय उद्दामपणा, संन्यास, परमभक्ति, इत्यादि अवस्थांचा अनुभव घेऊन वैष्णवधर्माला शुद्ध व पवित्र वळण लावले, व वैष्णवाना मान्यता व प्रतिष्ठा मिळवून दिली. वृंदावनातील कित्येक नामशेष झालेल्या स्थलांचा उद्धार केला, नवीन भक्तिपर ग्रंथांची रचना करविली आणि कन्याकुमारीपासून काशी, द्वारका, जगन्नाथ पुरी, वृंदावन, मथुरा (श्रीकृष्णाच्या निजगृही सुद्धा) वैष्णवधर्माचा प्रचार केला. त्यांची गणना विभूतिपूजकांनी अवतारी पुरुषात केली आहे. त्यांच्या वैष्णवधर्माचा विशिष्ट आविष्कार जरी आज जनांच्या आचरणात तितकासा दिसत नसला तरी ते जेव्हा होते तेव्हा व त्यानंतरच्या कांही काळात त्यानी समाजातील धर्मविषयक कठोर चालीरीतींना प्रेम, सहिष्णुता, सुशील आचरण व भगवंताची भक्ति यांनी आळा घातला हे निर्विवाद आहे.

चैतन्यांच्या वेळीं केवळ बंगालांत नव्हे तर साऱ्या देशातच अनेक पंथ होते व त्यांच्यातील द्वेष मत्सरांनी वातावरण बिघडून गेलेले होते. चैतन्यांच्या मनात असहिष्णुतेला थारा नव्हता. त्यांच्या पूर्ववयातील उद्दाम कटुवचनांची जागा संन्यासोत्तर प्रेमदशेत हरिगजराने घेतली होती. उपास्य व उपासक यांच्यात ऐक्य न कल्पितां कोणत्याही रूपाने देवाची उपासना करावी, पण बळी देणे, स्त्रिया देवाला अर्पण करणे, इत्यादि अत्यंत हीन चालीरीती बंद कराव्यात असें ते सांगत. देवाची उपासना व सेवा हीं चैतन्यांच्या धर्मशिक्षणाची सारभूत अंगे आहेत. परमेश्वराची भक्ति करणे हा मनुष्याचा सर्वश्रेष्ठ अधिकार आहे असें ते समजत असत.

## राधाभाव

भक्तीचे अनेक प्रकार व श्रेणी वैष्णवसंप्रदायांत प्रचलित आहेत. रामानंद व श्रीचैतन्य यांच्या संवादांत भक्तीची पराकाष्ठा म्हणून जी पायरी दर्शविली आहे ती म्हणजे कान्ताभाव किंवा राधाभाव होय. चैतन्यांचे असे सांगणें असे की गोपींना कृष्णाचा जेवढा उत्कट ध्यास लागला होता तेवढा भक्ताला लागला पाहिजे.

राधाकृष्ण हे रूपक आहे. राधा म्हणजे जीवात्मा व कृष्ण म्हणजे परमात्मा. राधेची कृष्णाकडे ओढ असते. प्रेमधनरूप, आनंदस्वरूप, मोहनमूर्ति कृष्णाचे स्वरूप त्याच्या मुरलीचा मंजुळ ध्वनि, तिला मोहून टाकतात. त्याच्याविना तिला जगणं असह्य होते; त्याच्या विरहाने ती विव्हळ होते; त्याच्यासाठी ती लौकिक, धनदौलत, घरदार सोडायला तयार होते. ही जी उत्कटता व आत्यंतिक तळमळ आहे ती भक्तीची श्रेष्ठ अवस्था होय, अशी चैतन्यांची शिकवण होती. पण ती नुसती शिकवणच नव्हती. ते स्वतःच त्या मधुराभक्तीचे जिवंत उदाहरण होते. "**आपणासारिखे करिती तत्काळ, नाही काळवेळ तयांलागीं ॥** असे त्यांचे कृपासामर्थ्य होते. भक्तीचे उत्तरोत्तर उच्च किंवा श्रेष्ठ प्रकार चैतन्य व रामानंद यांच्या संवादात दिलेले आहेत.

## भक्तिमार्ग

आपल्या व्यवहारांतील सर्व नाती व त्या नात्यांचे संबंध ईश्वराकडे लावण्याची किमया भक्तिमार्गाने पुढे ठेवली. जगत् तृणवत्, तिरस्करणीय, अत एव त्याज्य न मानतां सर्व विश्वातील परस्परसंबंध ही ईश्वराचीच विविध रूपे नटली आहेत अशी वैष्णवधर्माची अन्वय दृष्टी आहे. चैतन्यानी या धर्माचा प्रसार करताना सामाजिक उच्चनीचता, जातिभेद, धर्मभेद, स्त्री–पुरुष, बाल–वृद्ध आणि ज्ञानी–अज्ञानी अशा भेदांचे बंड मोडून टाकले.

कर्मठांची इतिकर्तव्यता स्नानसंध्यादि विधीत असते, ज्ञान्याचा पठन, मनन, ध्यान, इत्यादिकात असते, तशीच नामसंकीर्तन, गायन, भजन इत्यादिकानी भक्तांची इतिकर्तव्यता होते अशी काही लोकांची समजूत असते. धार्मिक जीवन म्हणजे काय याविषयी बहुतांची कल्पना अंधुक असते. "जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले" हे ही धार्मिक जीवनाला अत्यंत आवश्यक असे वात्सल्यभक्तीचे व्यक्त रूप असते. "वैष्णव जन तो तेने कहिये, जो पीड परायी जाणे रे" हे नरसी मेहताचे पद वैष्णवांच्या शुद्धाचरणाचा आदर्श सांगते.

चैतन्यांनी नामसंकीर्तनाबरोबरच अहिंसा, शम, दम, इत्यादि सद्‌गुणांना आपल्या आचरणात फार मोठे स्थान ठेवले होते. त्यांचे वैराग्य कडकडीत होते. तीर्थयात्रा करता करता त्यांनी अहर्निश सन्मार्गाचा उपदेश केला. बुद्धिनिष्ठ वादविवादांनी जशी त्यांनी लोकांची इतर धर्ममते खोडून काढली तशीच किंवा त्याहीपेक्षा जास्त प्रभावीपणाने त्यांनी आपल्या सहृदयतेने लोकांच्या अंतःकरणात भक्तीची भावना जागृत केली. वादपटु असूनही वैष्णवदीक्षा घेतल्यावर त्यांनी शक्य तों वादाचे प्रसंग टाळले होते. कृष्णनाम घ्या; त्यानेच तुम्हाला सर्वकांही मिळल असें ते सांगत असत.

वैष्णव संप्रदायाचे आचरणाचे यमनियम व सद्लक्षणें पुढे दिली आहेत. त्यांवरून या संप्रदायाचे निर्बंध किती कडक आहेत व आदर्श केवढा उच्च व सर्वहितपर आहे हे दिसून येते.

## भक्ताचे २६ आवश्यक सद्‌गुण

१. दयालुत्व २. भांडण न करणे ३. सत्यनिष्ठा ४. सर्वांशी समता ५. दोषरहितता ६. दानशीलता ७. मृदुत्व ८. स्वच्छता ९. सरळ स्वभाव १०. औदार्य ११. शांति १२. श्रीकृष्णाच्या ठायीं पूर्ण रति १३. सांसारिक कामनाशून्यता १४. विनय १५. धैर्य १६. आत्मनिग्रह १७. मिताहार १८. विवेकशीलता १९. आदरपूर्णता २०. निरभिमान २१. गांभीर्य २२. कारुण्य २३. मैत्रीभाव २४. काव्यमयता २५. दक्षता २६. मौन.

पुढील **नियमही** वैष्णवांना सांगितले आहेत :

१. रोज दोनदां स्नान. २. भगवत्पूजा. ३. मादक पदार्थ सेवन न करणें, ४. संपूर्ण शाकाहार. ५. अव्यभिचार. ६. जुगार न खेळणें. ७. अभक्तांचा संग सहभोजन, व्यर्थ गप्पा, सारहीन खेळ, तमाशे हीं टाळणें. ८. निरंतर भगवन्नामाचा जप.

वैष्णवांनी नाम घेतांना **पुढील प्रमाद टाळावयाचे असतात :–**

१. भक्तांची निंदा २. अन्य देवतांना कृष्णाशी समान लेखणें ३. गुरूची अवज्ञा ४. धर्मशास्त्राचे महत्त्व कमी मानणे ५. भगवन्नामाला अर्थवाद समजणे ६. भगवन्नामाच्या जोरावर पाप करणे ७. अश्रद्ध लोकांस नाममहिमा सांगणे ८. भौतिक सदाचार व भगवन्नाम सारखेच मानणें ९. भक्तीशिवाय उगाचच नाम घेणे. १०. नामजप, कीर्तन या प्रसंगीं ऐहिक विषयांत आसक्ति ठेवणे.

## इंग्लंड अमेरीकेत प्रभाव

अशा तऱ्हेच्या कडक नियमांचे पालन चैतन्यांनी शिष्याना घालून दिले होते. आज त्या गोष्टीला ४०० वर्षे होऊन गेली; पण चैतन्यप्रणीत कृष्णभक्तीचा मोठा प्रभाव इंग्लंड अमेरिका इत्यादि पाश्चात्य देशातही जाऊन पोहोचला आहे. तेथे भगवद्‌भक्तीची व नामसंकीर्तनाची प्रेरणा घेऊन गौरकाय लोक आनंदाने "हरे राम हरे कृष्ण"चा घोष करीत, मुक्त कंठाने भगवन्नाम गात, परीटघडीच्या पाश्चात्य संस्कृतीत लपून राहिलेल्या अपराधी व पापीपणाच्या भावनेवर (गिल्ट कॉन्शसनेस) कृष्णमयतेचा (कृष्ण कॉन्शसनेस) उतारा शोधीत आहेत.

नवविधा भक्तीत संकीर्तन व आत्मनिवेदन ही जी दोन अंगे आहेत ती चैतन्यांच्या कृष्णभक्तीत विशेष व्यक्त होतात असे वाटते. परंतु भक्तीची सर्वच अंगे त्यांनी आचरणात आणली होती. त्यांचा प्रभाव जरी घनतिमिरातील विद्युत्प्रकाशासारखा भासला होता तरी भारतीय जनतेच्या मूळच्या धर्मसंशोधक प्रवृत्तीचा हा एक दिव्य उन्मेष आपल्या उत्तुंग उदाहरणाने भक्तांना आजही समाजसन्मुख सत्य भक्तीचे मार्गदर्शन करीत आहे.

तुकोबारायांच्या शद्बांत त्यांच्या कार्याचे वर्णन करायचे तर—

**घोटविली लाळ ब्रह्मज्ञान्यांहातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडविली ॥**
**ब्रह्मभूत काया होई ती कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥**
**तीर्थभ्रामकासी आणिला आळस । कडू स्वर्गवास केला भोग ॥**
**सांडविला तपोनिधींतें अभिमान । यज्ञ आणि दान लाजविले ॥**
इत्यादि अभंगवाणीप्रमाणे त्यांनी जनमानसावर प्रभावही पाडला.

**चिरंतन कीर्ती**

श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद हे तेजस्वी तारे भारतीय जनतेचे मार्गदर्शक ठरले आहेत तसेच श्रीगौरांग प्रभूही वैष्णवांचे महान् आदर्श मानले जातात; त्यांची कीर्ति चिरंतन राहील.

# "मी आपलं म्हणतो"

( ले. — द. शं. टिपणीस )

## नांदी

ईशावास्यमिदं सर्वं – ईश्वर सर्व विश्वांत भरून राहिला आहे. या विश्वाच्या अणुरेणूंत प्राणिमात्राच्या हृदयांत, अंतरंगाच्या गाभ्यांत, ती विश्वशक्ति वास करून आहे. ईश्वर म्हणजे ज्ञान-शुद्ध, पवित्र, ज्ञान. याचाच अर्थ हा कीं या विश्वांतील अणु रेणू पासून तों मानवा पर्यंत, एवढेंच नव्हे, तर सर्व घटनांत ज्ञान भरून राहिलें आहे. श्रीमंतांच्या बंगल्यांतील जीवनापासून तों गरिबांच्या झोपडपट्टींतील जीवनापर्यंत सर्वांत ज्ञान भरून राहिलें आहे. हें विश्व म्हणजे आजपर्यंत ज्ञात असलेल्या सर्व उपनिषदांतील श्रेष्ठ असें उपनिषद् आहे. फक्त हें उपनिषद् वाचतां आलें पाहिजे. हें वाचन फक्त सद्गुरूपाशींच वाचावयास शिकतां येते. यास्तव या सृष्टींतील सर्व सद्गुरूंना वंदन करून त्यांच्या आशीर्वादानें हें श्रेष्ठ उपनिषद् वाचण्याचा पुन्हां एकदां प्रयत्न करतों. साईलीलाचे वाचक म्हणजे साईभक्त. भक्ताला केलेलें वंदन हें देवाला केलेल्या वंदनापेक्षांही त्याला अधिक प्रिय आहे असें श्रीकृष्ण भगवद्गीतेंत सांगून राहिले आहेत. यास्तव सर्व साईभक्तांना वंदन करून व बाहुबली जनता जनार्दनरूपी श्रीसाईच्या चरणांना स्पर्श करून प्रयत्न चालू करतों.

## १. चोरी बंदी

तें एक राज्य होतें. लोक सुखी होते. निदान राज्यकर्त्या पक्षाला तसें वाटे देश धन धान्यानें समृद्ध होता. धन थोडयांनाच मिळे. पुष्कळ लोकांना धान्य मिळे. पण जेमतेम पोटापुरते. कित्येकांना तितकेही मिळत नसे. धान्य उत्पादन भरपूर होते. 'तेन त्यक्तेन भुंजीथा:' या न्यायाने जनता जीवन कंठीत होती. लोकांचें जीवन सुखी व्हावें म्हणून नानाप्रकारच्या बंद्या होत्या. दारूबंदी, मटकाबंदी, सोने बंदी, काळा बाजार बंदी वगैरे. कायद्यानें चोरी बंदीही होती. पण एक पिढी अनुभवानंतर प्रत्यक्षांत असें आढळून आलें की बंदी घातली तरी ती बंद गोष्ट माणूस चोरून करतो. लोकांना खुल्या पेक्षां चोरून अधिक पसंत पडते. त्यांत त्यांना पराक्रमाचें मानसिक सुख मिळतें. यामुळें हें बंद असेच चालु राहावे म्हणून लोक वार्षिक सत्यनारायणाची पूजा करतात व चांगले दिवस आले म्हणून आनंदांत असतात. सलोख्याने, समजुतीनें व बोलाचालीनें म्हणजे वाटाघाटीनें बंदचा हा कायदेभंग थांबवण्याचा सरकारनें प्रयत्न केला. पण छट्. कांहीच मात्रा चालेना. काय करावें हें सरकारला कळेना. एक बडा मानसशास्त्रज्ञ सरकारला भेटला. त्यानें सांगितलें की बंदी असली

कीं लोक चोरून करतात. बंदी नसली तर सांगूनही ते करणार नाहींत. म्हणून प्रथम चोरीवरील बंदी उठवा. म्हणजे लोकांची चोरीची संवय नाहींशी होईल व मग कोणत्याही बंदीची जरूरी राहणार नाही. खलबते झाली. गलबत्यांचे ऐकले व प्रयोग म्हणून सरकारने चोरी वरील बंदी अंशत: शिथिल केली. फक्त रात्री १० ते सकाळीं ५ या दरम्यान चोरी करणें हा गुन्हा होईल अशी कायद्यांत दुरुस्ती झाली. यांत उद्देश हा कीं चोर झाला तरी तो माणूस आहे. त्याला कांहीं लज्जा आहेच कीं नाहीं. दिवसा ढवळ्या चार लोकांच्या देखत लाजेकाजेस्तव तरी कोणी चोरी करणार नाही. परिणाम उलट झाला. खुल्यांत चोऱ्या तर होतच राहिल्या व शेष बंदीतही चोरून चोऱ्या अधिक वाढल्या ! कोणतीही गोष्ट यशस्वी रीतीनें चोरून केली कीं त्यांत विजयाचा केवढा आनंद मानवी मनाला होतो हें अनुभवानें माहीत असूनही सरकार विसरून गेले. मिठाईच्या दुकानांतून किलो अर्धा किलो पेढे विकत घेऊन ते खाण्यांत जो आनंद आहे त्यापेक्षां दुकान दाराचे लक्ष चुकवून सफाईदार पद्धतीनें मूठभर पेढे पळवून खाल्यास शतपट आनंद होतो हें कोणीही चोर सांगेल. अशा वेळीं महायुद्ध जिंकल्याचा आनंद वाटतो. खरं म्हणजे तसे आपण सर्वच चोर आहोंत. "हम सब चोर हैं". उभ्या आयुष्यांत आपण चोरून कांहींच केलें नाहीं असें शपथ पूर्वक सांगणारा मानव अजून अवतरायचा आहे. जो चोरून करतो तो मानव अशी मुळीं व्याख्याच आहे. कारण इतर कोणीही प्राणी कांहींही चोरून करीत नाहींत. असा हा मानवी स्वभाव आहे तों पर्यंत बंद काय आणि खुलें काय सारखेच.

## २. कपाळावरील केस

निसर्गाचे नियम व योजना म्हणजे कांहीं एकाद्या शासनानें केलेले नियम व योजना नव्हेत कीं वेळोवेळीं जमवून घेण्यासाठीं मुरड घालीत गेल्यामुळें शेवटीं सर्वच कायद्याचा बट्ट्याबोळ व्हावा. हेंच पहाना. डोळ्यांच्या वर केसाळ भुवया असतात. त्यांच्यामुळें चेहऱ्याला एक प्रकारचें सौंदर्य प्राप्त होतें. म्हणून दाढी मिशा सफाचाट झाल्या तरी भुवयांच्या भरीस अजून तरी कोणी पडला नाहीं. वया प्रमाणें हे केस वाढत जातात व ते लांब होऊन डोळ्यावर येतात व डोळे झाकले जातात. खेड्यापाड्यांतून अशा भुवयांचे ८० पुढील म्हातारे या सुधारणेच्या युगांतही दिसून येतील. हे केस निर्माण करण्यांत निसर्गाचा उद्देश सुंदरपणा असला तरी त्यांत उपयुक्तताही आहे. या केसाळ भुवयामुळें धूळ केरकचरा यांपासून डोळ्यांचें रक्षण

होतें. याही पेक्षां कांहीं विशेष असावें असें वाटतें. भुवयाचे भरपूर केस डोळ्यावर आल्यामुळें स्पष्ट दिसत नाहीं. म्हातारपण म्हणजे बहुतेक आयुष्य चालून आल्यावर विश्रांतीचा टप्पा. या चालींत ठिकठिकाणीं जें कांहीं दिसलें त्याच्या विसरलेल्या, अगर विसरण्याचा प्रयत्न होत असलेल्या, स्मृति बरोबर आलेल्या असतात. हें जग, म्हणजे त्यांतील माणसे, कशी माणुसकी विना आहेत, दररोज दिवसरात्र किती अनिष्ट घटना घडत असतात, हें सर्व एकदां पाहिलें असल्यामुळें उर्वरित प्रवासांत पुन्हां पहाण्यास नको म्हणून निसर्गानें डोळे अधू करून त्यांवर हें केसाळ झडप तर घातलें नसेल ना ? असा भास अशा चेहऱ्याकडे पाहिल्यावर होतो. आणि मग वाटतं कीं तरुणांनीं कपाळावर डोळ्यांपर्यंत केसाचा झुपका ओढणी सारखा ओढून घेतला तर त्यांतही असाच कांहीं उद्देश नसेल ना ? कदाचित तरुणांचा आंतला आवाज त्यांना सांगत असेल कीं बेटयांनो, हें जग असं आहे कीं त्याकडे उघडया डोळयांनीं पहाण्यांत अर्थ नाही. पहायचंच तर एका डोळयानें चोरून खालच्या मानेने पहा. यांत संरक्षण आहे. म्हणून असे तरुण खाली मान घालून तिरक्या नजरेनें पहात असतात. असं असेल तर तरुणांकडे आपण तिरक्या नजरेनें पाहणें योग्य ठरेल काय ? जगांत अशी पुष्कळ दृश्यें आहेत कीं तीं दिसूं नयेत म्हणून आपणांस डोंळ्यांवर कातडें ओढून घ्यावें लागते. तरुण केस ओढून घेतात. काय फरक ? आंतल्या आवाजाला विरोध करा कशाला ? केला तरी तो कोण जुमानणार ? जगांतील प्रत्येक गोष्ट आपल्या मरणानें मरत असते. समुद्रावर लाटा येतात नि जातात. त्यांना थोपवण्याच्या प्रयत्नांत आपणच दुखावले जायचे. स्त्री प्रमाणें फॅशन ही चंचल आहे. चिंता न करणें. हेच तरुण पुढें कपाळावर कातर मारतील. उगाच हळहळ कशाला आणि संताप करून घ्या कशाला ?

## ३. द्रौपदीवस्त्रहरण

द्रौपदीवस्त्रहरणाची महाभारतांतील घटना सर्वांना माहीत आहे. महाभारताचें अलीकडे आधुनिक दृष्टीनें बरेच संशोधन झाले आहे व होत आहे. आम्हीही त्यांत थोडी भर घालूं इच्छितो. आमचें संशोधन आहे द्रौपदी वस्त्रहरणाबद्दल. युधिष्ठिर अलायस (alias) धर्म याची भूमिका वास्तववादी आहे. जें सत्य आहे तें मानलें पाहिजे. जग मिथ्या आहे असें वेदान्ती सांगत असले तरी तो मात्र जगाकडे, त्यांतील घटनांकडे, सत्याच्या दृष्टिकोनांतून पहातो. ऐहिक व न्यायनीतीला धरून भीमाची दृष्टी वावरत असते. भीमशक्ति (म्हणजे जनतेची शक्ति) अन्याय व अनीतीच्या

विरुद्ध उफाळून येते. या अतिसूक्ष्म दृष्टीनें, म्हणजे डोळे किलकिले करून, म्हणजे जवळ जवळ झोपेंत, महाभारत वाचल्यास या गोष्टी कोणाच्याही ध्यानांत येतील. आतां द्रौपदीवस्त्रहरणाबद्दल बघाना. द्रौपदीवस्त्रहरण ही कौरव पांडवांच्या युद्धाची नांदी आहे तर द्रौपदीवस्त्रहरण ही त्याची भैरवी आहे. कौरवांनी द्रौपदीची केलेली विटंबना म्हणजे अखिल स्त्री जातीची विटंबना. विवाह संस्थेच्या पवित्र्यावर घाला घालणारे हें दुर्योधनाचें कृत्य. म्हणून शेवटीं भीमाला त्याच्या मांडीवर गदा हाणावी लागली. भीमशक्तीला ही विटंबना म्हणजे अश्लील वाटली. सभेंतील श्रेष्ठजनांनाही असेंच वाटलें. पण ते कौरवांना विरोध करूं शकले नाहींत. कारण ते ओशाळलेले होते. त्यांनीं कौरवांचे पुष्कळ खाल्लें होतें. युधिष्ठिर तर वास्तववादी. वास्तवतेंत कसली अश्लीलता ? आणि कसली लाज ? जें येईल तें पहावें आणि गप्प बसावें. म्हणून त्यांनीं विरोध केला नाहीं. भीमा खेरीज बाकीचे पांडव खालीं माना घालून बसले. म्हणजे ते बहुतेक चोरून पहात असावेत. उघड विरोध पण चोरून पाठिंबा ही त्यांची दृष्टी. एकटा भीम मात्र निधड्या छातीचा. या वस्त्रहरणाविरुद्ध गरजली ती भीमवाणी. कृष्णाला हें असें कांहीं चार चौघांत करणें अश्लील वाटत असावें. नसतें तर त्यानें द्रौपदीला पातळें पुरवलीं नसतीं. द्रौपदी वस्त्रहरणांतील सूक्ष्म धागे दोरे हे असे आहेत. मराठी नाट्य सृष्टींतील वाग्युद्धाची नांदी ठरणारा कांहींसा असाच प्रसंग मराठी रंगभूमीवर घडला. वास्तववादी साहित्यिक युधिष्ठिरांनीं त्याला विरोध केला नाहीं. सत्य तें त्यांनीं उघड्या डोळ्यांनी पाहिलें. बाकी वरून स्थितप्रज्ञ. खालीं मान पण चोरून पहाणें. भीमाला मात्र हें खपले नाहीं. त्यानें विरोध केला. या वास्तववादी धुक्यामागें काय आहे तें तो जाणत होता. दाम करी कामाचें हें जग, तेथें ओशाळली नीति. वाल्मिक ऋषि असते तर रामायण बाजूला ठेवून वास्तववादी सुरांत ते सांगत सुटले असते कीं, बापहो, जगांत नाहीं राम रे —— दाम करी काम रे, वेड्या, दाम करी काम रे.

## ४. स्टोव्ह

तो एक स्टोव्ह होता. पहिल्यानें घरांत आला तेव्हां त्याचे कोण लाड कौतुक झालें. होताही तसाच गुणी तो. किती छान दिसे. कांति कशी सोन्यासारखी. अंगाने भरदार. ताकद केवढी ! जोस किती ! दोन पंप मारले कीं फुर्‌–र्‌–र करी. कामाचा उरक व चपळाई फार. चहाचे आधण ठेवावे, चहा साखरेचे डबे काढण्यास जावे व मागें वळून पहावें तों पाणी उकळायला लागलेलें. दुधावरचें

लक्ष जरा चुकलें कीं लगेच शुभ्रगंगा वाहूं लागायची. असा चपळ. आणखी दोन स्टोव्ह होते. पण ते वयस्कर होते. म्हातारपणामुळें थकले होते. त्या तरुणाइतकी ताकद व चपळाई यांच्या ठिकाणीं नव्हती. त्यामुळें तो सर्वांचा आवडता व ह्यांच्याकड कोणी बघतही नसत. पण हे म्हातारे ऐन वेळीं उपयोगी पडत. म्हणून थोडा फार तरी आव होता ह्यांचा. कांहीं वर्षें गेली. त्या स्टोव्हचें तरुणपण संपलें. अधून मधून त्याची प्रकृति बिघडूं लागली. डॉक्टरकडे सारखे जावें लागे. खेपा घालून पोरेबाळे कंटाळली. सुरवातीनें टाचणीनें टोचल्या खेरीज काम सुरूच करीत नसे. टोचलें कीं मग कुठें बुवाजी जागे व्हायचे. चार दिवस जातात न जातात तों निपल-मध्यें पिनच अडकून बसे व त्याची घासलेटची चिमणी होई. मग त्याला नवीन निपल घालण्यासाठीं गाडींतून (पिशवीतून) डॉक्टरकडे न्यावे लागे. त्यानंतर चार दिवस प्रकृति ठीक राही आणि मग बर्नर तुंबून बसे. सायकलच्या पंपानें त्याचा घसा साफ करावा लागे. चार दिवस बरे जात. पुन्हां डॉक्टराकडे. त्यानें तपासले व घसाच काढून टाकला व नवीन बसवला. कांहीं महिने प्रकृति उत्तम राहिली. पण पुन्हां पिन पासून सुरवात झाली. हातपाय चांगले होते. पण पोट (टाकी) व घसा यांत वारंवार बिघाड होऊं लागला. डॉक्टरांचें बिल वाढतें राहिले. पोटांत केरकचरा फार साठून राहिला त्यामुळें प्रकृति पार ढासळली. डॉक्टर (स्टोव्हचे) कंटाळले व शेवटी म्हणाले, "साहेब, हा म्हातारा झाला. आतां असंच चालायचं. जमेल तितके दिवस घ्या काम करवून. नाहींतर आपला नवीनच घेऊन टाकाना कसा ?" तरुणपणी कांहीं वाटत नाहीं. जोम असतो. दम असतो. पण वयस्कर होऊं लागला कीं मानव असाच स्टोव्ह प्रमाणें करूं लागतो. एकदां पोट बिघडलें कीं ताळ्यावर येणें कठीण. कर्म म्हणतें जाऊं द्या त्याला. नवीन आणा. घरोघरीं चालणारी ही एक कथा.

# देवाची आठवण

सौ. श्री शहाणे

माणसाला देवाची आठवण सदैव यायला पाहिजे. स्त्री माहेराहून परत आल्यावर तिला कांही दिवस माहेरच्या माणसांची आठवण येते. आपल्या आईची आठवण येते. पण चार–आठ दिवसानी ती आपल्या संसारात इतकी बुडुन जाते की तिला प्रवासातल्या सहप्रवाशाप्रमाणे माहेरचा संपूर्ण विसर पडतो. पण अशाप्रकारचा आपल्याला देवाचा विसर पडू नये. बदलत्या ऋतू प्रमाणे आपण देवाची आठवण ठेवायला हवी.

ती कशी ? उदा० उन्हाळा आपल्याला जाचायला लागला की मग पावसाळ्याची जशी आपण प्रतीक्षा करतों. पावसाळा कंटाळवाणा झाला, त्याचा चिकचिकाट वाटायला लागला की आपण म्हणतो आतां लवकर हिंवाळा येऊं दे ! पण पुन्हा हिंवाळा आला कीं थंडीने बेजार होत असताना आपल्याला ऊबदार उन्हाची आठवण येतेच ना ? म्हणजे परमेश्वर आपल्या स्वरूपाची सदैव तुम्हाला जाणीव देत असतो. कां ? तर हे मानवा! तुला मनुष्य जन्माला घालून माझी भक्ति करण्यासाठी मी तुला ज्ञान दिलं ! माझी आठवण तुला राहावी हाच माझा तुला जन्माला घालण्याचा उद्देश !

आपण संसारात सदैव दंग असतांना नेहमी सुख असताना सुखात इतके तल्लीन झालेलो असतो. त्यावेळी तर आपल्याला जगाची, नातेवाईकांची, म्हणजे सगे सोयरे कोणाकोणाची आठवण येत नाही, मग देवाची कुठली हो यायला ? पण असे होतां कामा नये. सुखदुःखात देखील सदैव त्या दयाघन प्रभूची आठवण आली पाहिजे. कारण सर्व शक्तिमान परमेश्वर सुखाचा काय किंवा दुःखाचा काय निर्माता असतो. एखादा माणूस गेल्यावर आपण म्हणतो परमेश्वरी लीला ! दुसरे काय ? ग काय हो, तो ऐंशी वर्षे जगला. मुलेबाळे, नातवंडे, लेकी सुना गाड्या घोडे सगळं गळं त्याला प्राप्त झालं होतं. त्यानं भोग उपभोग घेतले ही देखील केवढी मोठी .रमेश्वरीलीला !

पण माणसाची दृष्टी एवढी व्यापक असती तर ! तर कशाला दुःखाच्या प्रमाणे सुखाच्या वेळी देखील .नामस्मरण केल्याविना राहाता ! कुंतीने भगवान श्रीकृष्णाला सांगितले, "नारायणा, तूं मला सदैव दुःख दे, की त्यामुळे मला तुझा विसर पडणार नाही ! " खरोखर काय ही अलौकिक मागणी ? देवाजवळ सुख सारेच मागतात ! पण कुंतीप्रमाणे दुःख मागणारा विरळाच ! तात्पर्य – देवाची आठवण सुखापेक्षा दुःखात होते. आपण संकटकाळीं देवाला नवस करतो. आपल्या मना प्रमाणे

झालं म्हणजे आपण देव नवसाला पावला असं म्हणतो ! पण खरं पाहिलं असतां आपण त्यावेळी ज्या आर्ततेने देवाला आळवतो तो भाव जाणून परमेश्वर तुम्हाला संकट मुक्त करतो. इतर वेळी आपण फक्त हात जोडतो. असं होता कामा नये ! सदैव परमेश्वराची आठवण आपल्याला यायला हवी. तुमच्या मुखी त्याचं नामस्मरण व्हायला हवं ! आपण आणि संत ह्यामध्ये फरक आहे तो हाच ! संत सदैव देवाचं नामस्मरण करतात. त्यांना मरणाचं भय वाटत नाही. सदैव मरण डोळ्यांसमोर ठेऊनच ते वावरतात. उदा. आपुले मरण पाहिले म्या डोळा – काय तो सोहळा वर्णू देवा ! कसे ते पाहा. आपल्या समोर मरण हा शब्द जरी उच्चारायचा तरी आपल्याला तो अभद्र वाटतो. कारण आपल्याला जी गोष्ट अप्रिय ती अभद्र ! संतांचं तसं नाहीं. त्यांचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोनच वेगळा आहे. नव्हे असतो. त्यांना लोकाना परमेश्वराचं नामस्मरण करायला शिकवायचं असतं. त्यांच्या डोळ्यापुढे सदैव परमेश्वराची मूर्ति असते. हाच त्यांच्यातला आपल्यातला फरक ! म्हणून संतांचा सहवास धरावा. ते आपल्याला कशा मार्गानी गेलं म्हणजे परमेश्वर प्राप्ती – म्हणजे त्याचा विसर तरी पडणार नाही इतपत आपली धारणाशक्ति किंवा आपली विचार शक्ति वाढवतील !

आपण कोणतीही गोष्ट, पदार्थ म्हणा, केला की त्याचा नैवेद्य देवाला दाखवतो ! खातो का तो पदार्थ देव ? नाहीं ! अहो देव जर असा प्रत्येक पदार्थ खायला लागला तर आपण कधीच त्याला नैवेद्य दाखवणार नाहीं. तरी ह्या नैवेद्य दाखवण्या मागे आपल्या पूर्वजानी आपल्याला एक प्रकारची शिकवण लाऊन ठेवल्येय ! काय ? तर परमेश्वराची आठवण ! भगवंताची आठवण ! त्याचं नामस्मरण करा नी मग खा ! केवढी चांगली शिकवण ! आधी देवाला नमस्कार करून मग आपण वडील मंडळींना नमस्कार करतो ! सर्व प्रथम देवाला वंदन !

देवाचं नामस्मरण केल्यानं, देवाची आठवण केल्यानं, अनंत फायदे होतात, की जे सट्टा–लॉटरी–रेस अमकं ढमकं काय लागल्यानं होतात तसले तकलादू फायदे नव्हेत. पैसा मिळतो. जातो. पुन्हा मिळतो. पण ! एकदां तुम्हाला परमेश्वर भेटला की त्याच्या प्राप्तीसारखे सुख कशात नाहीं. ते अनंत काळ टिकणारं सुख आहे. त्याच्या प्रेमासाठी झुरा. त्याच्या भक्तिसाठीं झुरा ! तो तुमच्या भक्तिसाठी भुकेला आहे. साईबाबांच्या एका आरतीत म्हटलंय ना ? **“असोत कितीहि मोठ्या पापांच्या राशी । नामस्मरणे अवघ्या जाती विलयासी । कृपा प्रसादे लाधे सकलहि**

**समृद्धी। कुशल कराया येती त्या। ऋद्धि सिद्धी।"** एवढा मोठा नामाचा महिमा! एवढा मोठा परमेश्वराची आठवण केल्याचा फायदा.

एकमेकाला दिलं घेतलल असतं तेच माणूस आठवतो. सदा दारं बंद करून आपल्या पुरतं पाह्यंच नसतं. दुसऱ्यासाठी घांसातला घास दिलात तर तो परमेश्वराला पोंचतो. दुष्काळांत अशांचीच गरज आहे. अशा प्रकारची जाणीवपूर्वक वागणूक ही देखील परमेश्वराचीच आठवण आहे. कोणी कोणाच्या घरचं लुटून नेत नसतो, तर आपण समाजाचं ऋण अप्रत्यक्ष रित्या देखील फेडूं शकतो. उदा० नासाडी टाळणं, काटकसर, मग ती धान्याची असो विजेची असो अगर पाण्याची! ज्या-योगे सर्वांना कांही काळ सर्व मिळण्यापेक्षा सर्वांना सर्वकाळ कांहीतरी मिळण्यासाठी काटकसरीचा अवलंब करायला लागला तरी हरकत नाही. ह्या योगे देखील आपण परमेश्वराची आठवणच करतो. तो काय केल्याने मिळेल नी काय न केल्याने मिळणार नाहीं, हे ज्याचे त्यानी ठरवायचं! कसे? तर उपयोग झाला नाहीं तरी चालेल पण उपद्रव होता कामा नये. सतत उद्योग होणार नसेल तर आळस तरी न करतां आपल्या पुरतं कमवावं. काटकसर जरी जमली नाहीं तरी उधळपट्टी तरी थांबवावी! ही जरी सामाजिक कर्तव्यात मोडणारी बंधन असली तरी ते देखील परमेश्वराला स्मरून पाळायला कांही हरकत नाहीं. इथे सुद्धां तुम्ही त्या परमेश्वराची, देवाची, आठवण ठेवायला हवी. "गरज सरो नी वैद्य मरो," असं परमेश्वराच्या बाबतीत असता कामा नये. 'तूं उभा पुढे मागुति'. पण केव्हा? तर तूं त्याला स्मरशील तेव्हां! देवाची आठवण करा. देव तुमच्या पासून अजिबात दूर नाही. 'नका जाऊ देवळात, देव तुमच्या हृदयात'! पण आठवण मात्र पाहिजे! तुमच्या हृदयात देव आहे नी तुम्ही रानोमाळ भटकत राह्यलात तर काय फायदा? तिथल्या तिथे स्मरण हीच खरी त्याची आठवण! पावलो पावली त्याची आठवण राह्यला पाहिजे. उठता बसता. झोपता जागता. जसे दळिता कांडिता जनीला देव दिसत होता तशी तुम्हाला सदैव देवाची आठवण राह्यला पाहिजे.

ज य सा ई!

# मनचं साधे तर दारिद्र्य कां बाधे?

सौ. लक्ष्मीबाई पटवर्धन.

जगांत असंख्य माणसं रंजलेलीं, गांजलेलीं असतात. कां ? तर त्याचं उत्तर म्हणजे त्यांची निष्ठा कुठेच नसते. संकटं आलीं, अडचणी आल्या कीं 'देवानं माझं वाईट केलं' एवढंच म्हणायचं त्याना ठाऊक; पण एरवीं देव म्हणजे काय हें त्यांच्या गांवींही नसतं. त्यांची कशावरही श्रद्धा नसते. त्यांच्या ठायीं भावाचाच अभाव असतो. तेव्हां तिथे भक्तीचं वावडंच असतं. अशीं माणसं ! छे, माणसं कसलीं ? दानवच ते ! अशा अश्रद्धावान् माणसांना मनःशांति कधींच लाभत नाहीं. त्यांच्या दृष्टीला सगळ्या गोष्टी वाईटच दिसत असतात.

साधु–संत यांचेबद्दल भोंदू, ढोंगी, स्वार्थी अशींच मुक्ताफळं त्यांच्या तोंडून तुम्हांला नेहमीं ऐकायला मिळतील. संत वचन, सुविचार, चांगल्या म्हणीसारख्या गोष्टीतही त्यांचे मनांत विकल्पच येत असतात.

माझ्या परिचयाच्या एक भगिनी सदान्‌कदा अगदीं त्रासलेल्या, चिडलेल्या असतात. कारण काय ? तर म्हणे अनेक गोष्टी त्यांच्या मनाविरुद्ध घडत असतात. त्यामुळें त्यांचे तोंडून पुष्कळदां 'मनचं साधे तर दळिद्र कां बाधे !' ही म्हण मी ऐकली आहे. एक दिवस ह्या म्हणीविषयीं विचार करतां माझ्या ध्यानांत आलं कीं, ही बाई त्या म्हणीचा वापर अयोग्य ठिकाणीं करते, कारण मनासारखं झालं तर दारिद्र्याला थाराच मिळणार नाही, खरं ना ?

आणि म्हणून आमचे संत नेहमीं समाधानी असतात. तुकाराम बोवांच्या घरांत अठराविश्वे दारिद्र्य होतं तरी ते म्हणत—

**ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असूं द्यावें समाधान ॥**
**वाहिल्या उद्वेग दुःखची केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥**

संतांनीं षड्‌रिपूंना जिंकून मनोविजय मिळविलेला असतो.

मला लहानपणापासून देवादिकांच्या, संतांच्या अनेक गोष्टी ऐकायला नि अनुभवायला मिळाल्या, त्यामुळें परमेश्वरावर दृढ निष्ठा बसली, वडील माणसं आणि संतवचनं यांवर परिपूर्ण भरंवसा टाकायची संवय जडली.

तुकारामबोवांचं **लई नाहीं, लई नाहीं मागणं, पोटापुरतं देई देवा ॥** हें वचन नेहमीं डोळ्यांपुढें असल्यामुळें आपण उगीच कांहींतरी मिळविण्याची हांव धरायची नाहीं, अशी स्वभावाची घडण घडत गेली व त्यामुळें जें मिळतं त्यांत समाधान मानण्याची संवय लागली. पण कांहीं वेळां मनरूपीं ओढाळ गुरूं सैरावैरा धांवत सुटतं. त्याच्या मुसक्या बांधून त्याला ठिकाणावर आणण्यासाठीं श्रीसद्गुरु रामदासस्वामींचं वचन बजावून सांगतं, **मना, त्वांचि रे पूर्व संचीत केलें । तया सारिखें भोगणें प्राप्त झालें ॥**

अशा प्रकारें संतवचनाचा खुराक मिळालेल्या मनाला नेहमीं संतोष वाटतो, त्याला दारिद्रय कधींही भेडसावीत नाहीं. उलट परमेश्वर स्वरूप असे संत आम्हां सामान्य भक्तांचे मनोरथ पूर्ण करीत असतात. याची अनेकदां प्रचीति येते.

दोन वर्षांपूर्वी मी माझ्या मुलाकडे चिंचवडला दिवाळीला गेलें होतें. भाऊबिजेला माझ्या भाऊ–भावजयांना तिकडेच बोलाविलें होतं. आम्हां बहीण भावडांचा तो सोहळा अगदीं मजेंत साजरा झाला आणि सर्व मंडळी आपापल्या घरीं परतली. धाकट्या भावाला मात्र रजा असल्यामुळें तीं उभयतां चार दिवस राहिलीं होतीं. दिवाळीचं गोडधोड खाऊन कंटाळा आला, तेव्हां अगदीं भाजी भाकरीचा बेत करूं. अशीं आमचीं रात्रीं बोलणीं होऊन आम्ही झोंपलों. सकाळीं उठून मी दारची भाजी (अंबाडीची) खुडून आणायचं मनाशीं ठरविलं. पण सकाळीं भावाच्या मनांत आलं, कीं आपण मुंबईहून इथे आलोंच आहोंत तर आज देहू–आळंदीला जाऊन येऊं या. मी म्हटलं , बरं तर, मीही येतें तुमच्या बरोबर.

आम्ही लगबगीनंच गाडी गांठली आणि प्रथम देहूला गेलों. तुकारामबोवांचं तें पवित्र क्षेत्र, त्यांची ती शांत मूर्ती आणि त्यांची गाथा जिनं तारिली ती इंद्रायणी पाहून मनाला धन्यता वाटली, बोवांच्या वचनाची आठवण झाली, **काय उणें आम्हां । विठोबाचे पायी ॥** ताबडतोब आम्ही आळंदीला जाणाऱ्या बसमध्यें जाऊन बसलों,

आळंदीला गेल्यावर नदीवर स्नान आटोपून प्रथम ज्ञानेश्वर माउलीचं दर्शन घेतलं आणि नंतर १२ वाजतां नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या मठांत आम्ही पोहोंचलों. स्वामींचं दर्शन घेतलं तितक्यांत, 'पानं वाढलीत, जेवायला चला' म्हणून

आम्हांला मठांतल्या वाढप्यांनी हांका मारल्या. मी म्हटलं "आम्ही आधीं कळवलं नव्हतं, आयत्या वेळीं जेवायला येणं बरं नव्हे; आम्ही आमच्या बरोबर आणलेलं खाऊं म्हणजे झालं." त्यावर त्यानें सांगितलं, "भाकरी चालूच आहेत, पानावर बसा लवकर." आणि काय आश्चर्य ? मी जी घरी अंबाडीची भाजी–भाकरी करून भावाला वाढणार होतें ती आम्हां बहीण भावंडांना जणूं स्वामीनीं प्रसादाची आयती गरम गरम वाढली. मला आनंदाश्रू आले. असे संत भक्तांचे लाड पुरवतात. त्यानींच म्हटलं आहे **आवडीनें भावें हरी नाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व** आहे। आणि म्हणून मी म्हणतें, **मनचं साधे, तर दारिद्रय कां बाधे ?**

# श्री माधवनाथ महाराज

ले. श्री. ना. हुद्दार

श्री मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, श्री ज्ञाननाथ, सत्यामलनाथ, गुप्तनाथ या परंपरेत अलीकडच्या काळांत श्री माधवनाथ महाराज हेही होऊन गेले. त्यांचे गादीवर सध्या श्री मंगलनाथ महाराज हे आहेत. नाथ संप्रदायाच्या अनेक शाखा होऊन त्यांचा सर्व भारतांत विस्तार झाला. त्यापैकी एका शाखेतील "श्री गुप्तनाथ" ही पूर्वाश्रमींची गंगाबाई नावाची महिला होती. नाथदीक्षा घेऊन ती पुढे योगिनी झाली. चित्रकूट जवळ करवी येथील श्री बालाजीमंदिराचे तळघरात हिची समाधी असून याच गादीवर श्री माधवनाथांना बसवण्यात आले होते.

महात्मे व साधुसंत यांची जीवनचरित्रें समुद्रावरील दीपस्तंभाप्रमाणें संसारसागर तरून जाण्यास सर्वसाधारण लोकांना मार्गदर्शक होत असतात. तेव्हां श्री माधवनाथ महाराजांच्या चरित्राच्या पठन-भजनानेहि चित्तशुद्धी होऊन त्याला सात्विक आनंद होईल यांत संदेह नाही.

## जन्म व बालपण

श्री माधवनाथांचे घराणें मूळ पांगरी, जि. नासिक येथील होय. पण पुढे मराठवाड्यांतील रंगाऱ्याचे देवगावी (लासूर रेल्वे स्टेशन, जि. औरंगाबाद) त्यांचे स्थलांतर झाले. त्यांचे उपनांव "रत्नपारखी" असून श्री मल्हारदादा व सौ. मथुराबाई हे त्यांचे माता–पिता होत. यांचा आचार धर्मनिष्ठ असून श्री यशवंतराव महाराज देव मामलेदार यांची त्यांचेवर कृपा होती. त्यांनी सौ. मथुराबाईंना सांगितले होते की, "तुझ्यापोटी योगी पुरुष जन्म घेईल.' हे दांपत्य काशी-प्रयागच्या यात्रेवर असतां चित्रकूटजवळ करवी गांवी आले. तेथे मल्हारदादांचे चुलतभाऊ बाळकृष्णपंत रहात असत. यावेळी सौ. मथुराबाई गरोदर असून त्यांचे दिवस भरत आल्याने त्यांना तेथेच मुक्काम करावा लागला.

यावेळी योगिनी गुप्तनाथांच्या गादीवर श्री विठ्ठलनाथ हे योगी पुरुष होते. चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १७७९ (दि. २६ मार्च १८५७) दिनी सूर्योदयापूर्वी मथुराबाई स्नान करून तुळसीप्रदक्षिणा करूं लागल्या. इतक्यांत त्यांना प्रसूतिवेदना सुरू होऊन सूर्योदयाकालीं नवबालकाचा जन्म झाला. बाराव्या दिवशी आनंदोत्सवपूर्वक या बालकाचे नांव "माधव" ठेवण्यांत आले.

पुढे मल्हारदादा पत्नी व मुलांसह पांगरी येथे गेले. माधव ५ वर्षांचा असतां मल्हारदादांचे निधन झाले. मथुराबाईंनी फार शोक केला. तेव्हा लहानग्या माधवनें त्यांच्या मांडीवर बसून आपली दृष्टी मातेच्या डोळ्यांवर स्थिर केली आणि तिला आत्म्याच्या अमरत्वाची जाणीव झाली व तिचे दु:ख कमी झाले.

लहानपणापासून माधव आपल्या विलक्षण बुद्धिप्रभावानें सर्वांना दिपवू लागला होता. लवकरच त्याला शाळेत घालण्यात आले, पण त्याचे लक्ष शिक्षणाकडे नसे. शाळचे निमित्त करून तो गांवाबाहेरच्या महादेवाच्या मंदिरात ध्यान करीत बसे, किंवा सोबत्यांसह भजनपूजन करण्यांत दंग होऊन जाई. पण तो शाळेत जाई तेव्हां कोणत्याही विषयांत इतर मुलांपेक्षा बुद्धीची विशेष चमक दाखवी.

८ व्या वर्षी त्याचा व्रतबंध करण्यात आला, संध्या, ब्रह्मकर्म यांत थोड्याच कालात त्याने प्राविण्य संपादन केले होते. शाळेकडे माधवचे दुर्लक्ष असल्याचे पाहून मथुराबाईंना फार काळजी वाटे. सटाणें येथे यावेळी यशवंतराव महाराज देव मामलेदार होते. त्यांच्या भेटीस त्या मुलासह गेल्या. त्यांनी सांगितले, "तुझा मुलगा मार्गावर आहे, काही काळजी करूं नको. मात्र त्याला लवकर करवीस घेऊन जावें."

याच सुमारास करवीहून बाळकृष्णपंतांचे माधवला घेऊन येण्यासंबंधी पत्र आले होते. वर्षप्रतिपदेच्या सुमारास मथुराबाई करवी येथे गेल्या. यावेळी माधव १० वर्षांचा होता.

## श्री गुप्तनाथांच्या गादीचे वारसदार

विठ्ठलराव महाराजांनंतर, श्री विश्वनाथराव महाराज हे गृहस्थाश्रमी गृहस्थ या नाथ गादीवर होते. विश्वनाथ महाराजांचे याचवेळी निधन झाल्यानें गादीवर कोणास बसवावे असा प्रश्न उपस्थित झाला. पांच मुलांची नांवे कागदावर लिहून त्या चिठ्ठ्या नाथांच्या समाधीसमोर ठेवण्यात आल्या, व त्यापैकी एक चिठ्ठी उचलली असतां ती माधवच्या नांवाची निघाली. तेव्हां अभिषेक करून विधिनुसार माधवला गादीवर बसविण्यांत आले व त्याचे नांव "माधवनाथ" ठेवण्यात आले.

अनुग्रह–दीक्षेसाठी माधवनाथांना शैलीशृंगीनें विभूषित करून तळघरातील गुप्तनाथांच्या समाधिजवळ बसविण्यात आले व दार बंद करण्यात आले. काही तासांनंतर "अल्लख" हा नाथ सांप्रदायाचा सांकेतिक शब्द आंतून ऐकू आला, तेव्हां दार उघडण्यात आले. या गुंफेत त्यांना गुप्तनाथांचा अनुग्रह झाला व नवनाथांची गूढ योगशक्ति संपादन करूनच ते बाहेर आले. याचा त्यांच्या आचार विचाराबर परिणाम होऊन ते विदेही स्थितीत राहू लागले.

काही दिवसांनी माधवनाथांना विश्वनाथमहाराजांचे कुटुंब ठकुबाई यांच्या स्वाधीन करून मथुराबाई आपल्या गांवी गेल्या. माधवनाथांची विदेही स्थितीतील वागणक पाहून ठकूबाई व इतरांस फार चिंता वाटू लागली. तेव्हां त्यांचे लग्न करून देण्यात यावे असा विचार करण्यात आला. माधवनाथांच्या हे तेव्हाच लक्षांत आले. तेव्हा ते एका दिवशी गुपचुप करवीतून बाहेर निघून गेले.

## तपःसाधना व तीर्थयात्रा

यानंतर एक वर्षाचा काळ त्यांनी तीर्थाटन व तपःश्चर्या करण्यांत घालविला. १३–१४ वर्षांच्या माधवनाथांनी बद्रिकेदार ते रामेश्वरपर्यंत आणि बंगालातील हेलारापट्टनापासून गुजराथेंतील गिरनार पर्वतापर्यंत तीर्थयात्रा केल्या. या काळांत त्यांनी नवनाथांची तीर्थस्थाने, सर्व ज्योतिर्लिंगे व सहा पुऱ्या पाहिल्या. हिमालयांत ६ वर्षे तपःश्चर्या करून व "एकमेवाद्वितीयम्" तत्त्वाची प्रचीति घेऊन ते करवीला परत आले. या कालातील त्यांच्या साधनावस्थेची तपशीलवार, माहिती मात्र उपलब्ध नाही.

करवीला आल्यावर माधवनाथांनी गादीचा व्यवहार आपल्या वृत्तीनुसार पाहण्यास आरंभ केला. दानधर्मे यज्ञकर्मे होऊं लागली, व त्यात बराच पैसा खर्च होऊ लागला. सखारामबापू यावेळी बालाजी संस्थानचे कारभारी होते. या संधीचा फायदा घेऊन बापूंनी बऱ्याच द्रव्याचा अपहार केला व देवाचे दागिनेही गहाण ठेवले. भाऊसाहेब जोग आदि नाथांच्या भक्तगणांना सखारामबापूंच्या कृष्णकृत्यांची माहिती लागली व त्यांनी नाथांना वारंवार जमाखर्च पाहण्याची विनंति केली. पण विरक्त वृत्तीमळे त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. एके दिवशी त्यांचेसमोर खर्चाच्या वह्या ठेवण्यात आल्या तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस आला. सखारामबापूही घाबरले व त्यांनी नाथांच्या पायावर डोके ठेवून क्षामायाचना केली. श्री जोगांचे म्हणणे असे की सखारामबापूंवर दावा करावा. पण माधवनाथ शरणागताला कसे दूर करणार ?

## करवीहून पुनः प्रयाण

दुष्प्रवृत्त सखारामबापूंनी मात्र यानंतरही पुनः कारस्थाने करून नाथांबद्दल ठकूबाईचे मन कलुषित केले. त्याही नाथांच्या खर्चिकपणामुळे नाराज झाल्या व त्यांनी नाथांना करवीबाहेर जाण्यास सांगितले. नाथांनी पडत्या फळाची आज्ञा स्वीकारून करवी सोडण्याचे ठरविले. परंतु नाथांच्या भक्तगणांना हे न रुचून "आपण नवीन मंदिर बांधू, आपण येथेच रहावें" अशी कळकळी ी विनंति केली. भक्तांचे प्रेम की मातृआज्ञापालनाचे कर्तव्य असा पेंच त्यांच्या समोर पडला. कर्तव्यास अधिक महत्व देऊन त्यांनी सर्वांस उपदेश केला. "नाशवंत कलेवराची आसक्ति सोडा. ईश्वरी स्वरूपाची कास धरा. तुम्ही स्मरण कराल तेव्हां मी भेटन" असा विश्वास दिला. ही घटना शके १८१२, सन १८९०, मधील आहे.

## अज्ञातवासातील काल

यावेळी नाथांचे वय ३३ वर्षांचे होते. यानंतर ५-६ वर्षे स्वैर पर्यटन करण्यात अज्ञातवासात त्यांनी घालवली. भक्तोद्धाराचे कार्य मात्र चालू होते. त्यांच्या भक्तगणांस राजेरजवाड्यांपासून रंकांपर्यंत, शिक्षित, अशिक्षित, हिंदु–मुसलमान–ख्रिस्ती अशा विविध लोकांचा समावेश होता. श्री माधवनाथ काशीस गेले व तेथे अनेकांना अनुग्रहीत केले. तेथून अमरकंटकला आले व तेथे २ वर्षे अरण्यवासात घालविली. नंतर इंदूर येथे यशवंतराव महाराज देव मामलेदार होते त्यांच्या दर्शनास गेले. इंदूरचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांचेकडे त्यांचा मुक्काम होता. श्रीनाथ महाद्वारापाशी पोचले तोच देव मामलेदारही त्यांच्या स्वागतासाठी महाद्वारी आले व दोघे कडकडून भेटले. श्री देवमामलेदारांनी नाथांना हाताने धरून त्यांना आपल्या निवासस्थानी नेले. श्री तुकोजीरावांचा श्री नाथांशी परिचय करून दिला व पुढे

सर्व राजघराणेंच माधवनाथांचे भक्त बनले. तेथून ते महू व धारला गेले. धारला विभूति देऊन काहींचे रोगनिवारण केले. हा चमत्कार पाहून डॉक्टर कीगन यांची श्री नाथांवर श्रद्धा बसली. नाथांनी त्यांना हातावर हात घासून त्याकडे पाहण्यास सांगितले तर हातावर दिव्य प्रतिमा दिसली. हीच साधना करण्यास त्यांनी त्यांस सांगितल.

## शेतराखणदाराचे काम

यानंतर श्रीनाथ खांडवा–चाळीसगावकडे गेले. पोहरे गांवी "धोंडचा" नांव धारण करून एका पाटलाकडे शेतराखणीचे काम करू लागले. पोटापुरते पाटलानें दूध द्यावे असे ठरले. एक दिवस श्री नाथ भजनांत रंगले असतां बैलाने शेतात शिरून गव्हाचे पीक नासले. यामुळे पाटलीण बाईना राग येऊन त्यांनी नाथांना खूप शिव्या दिल्या. नाथ शांतच राहिले. काम सोडून जाताना त्यांनी बाईस सांगितले की, "तुला ५२ मण गहूं होतील !" पुढे खरेच इतके पीक झाले. तेव्हा पाटलास फार पश्चाताप झाला.

येसगांव येथे संगळ व नगारा वाजवून सुंदर भजनें श्री नाथांनी केली. रोझेगांव येथे भिकमशाह संत जर्जरीबक्षच्या उरुसाकरता आले होते. त्यांची नाथांची भेट झाली. दोघांनी मिळून कुराणांतील ४ कलमांचे पठण केले. येथून नाथ वेरूरला गेले, व तेथील राममंदिरात त्यांनी कांही सुंदर चित्रे काढली. ती अजून पाहता येतात.

येथे चतुर्थाश्रमीं श्रीं चिद्घनानंद स्वामींशी त्यांची भेट झाली. त्यांनी नाथांना सांगितले 'तुझी आई तुझी आठवण काढीत आहे तिला जाऊन भेट व अज्ञातवास संपवून लोकोद्धाराचे कार्य कर.' नाशिक जवळच्या सप्तशृंगी जवळच्या वनांत काही दिवस राहून माधवनाथ देवगांव येथे जन्मदात्या मथुराबाईच्या भेटीस गेले अनेक वर्षांनंतर मातापुत्रांची ही भेट झाल्याने मातेला फार आनंद झाला. "आता मला सोडून दूर जाऊ नकोस" असे मातेने सांगितले. मातेचा अंतकाल समीप आला आहे हे जाणून नाथांनी हे मान्य केले. सहा महिन्यांत तिचे निधन झाले. शेवटच्या दिवशी मातेचे डोके मांडीवर घेऊन नाथांनी समाधि लावली व नंतर तिचे प्राणोत्क्रमण झाले. योगी पुत्राचे सानिध्यात मरणाचे भाग्य त्या मातेला लाभले.

## लोकोद्धाराचे कार्य

इ. स. १८९६ म्हणजे वयाच्या ३८ व्या वर्षापासून श्री माधवनाथांनी प्रगटपणें धर्मप्रसाराचे व लोकोद्धाराचे कार्य सुरू केले. या कालात जयपूर, चित्रकूट, काशी, नागपूर, खानदेश, मुंबई, पुणें, कारवारपर्यंत संचार करून भाविक जनतेला मार्गदर्शन केले.

चित्तशुद्धीपासून आरंभ करून प्रत्येकाला त्याच्या पात्रतेनुसार जप व योगादि साधनांचा ते उपदेश करीत. गंगामाई जशी चांगला वाईट असा भेद न करतां सर्वांस जवळ करते तद्वत् नाथही त्यांचेकडे येईल त्याला आत्मोद्धाराची प्रेरणा करीत. त्यांच्या शिष्यांची संख्या अगणित असून काही शिष्यांना तर जीवन कालातच त्यांनी पूर्णत्वाला पोचविले.

## श्री नाथांची उपदेशप्रणाली

योगाच्या कष्टसाध्य मार्गापेक्षा सर्वसाधारण लोकांना ते सुलभ भक्तिमार्गाचा उपदेश करीत व या भयरहित निश्चित साधनाने आत्मोन्नति करण्यास सांगत. ईश्वरी शक्तीवरील श्रद्धा वाढविण्यासाठी व भक्तांचे दुःख व रोग निवारण्यासाठी त्यांनी अनेक चमत्कार दाखविले. व्याख्यानें, प्रवचनें यापेक्षां बैठकीत चर्चा, संवाद, शंका-समाधानाचा मार्ग स्वीकारणें व शरण येईल त्याला त्याच्या पात्रतेनुसार भक्ति व उपासनेचा मार्ग दाखवून त्याला परमार्थप्रवण करणें ही त्यांची कार्यप्रणाली होती.

सर्व प्रगतीचे मूळ चित्तशुद्धि, श्रद्धा व प्रयत्नसातत्य या त्रयीमध्यें आहे. शुद्धिविना मोहपाश सुटत नाहींत; श्रद्धेविना शेवटपर्यंत टिकाव धरतां येत नाहीं; व सतत प्रयत्नाशिवाय यशसिद्धि नाहीं. या त्रयीवर श्री माधवनाथ भर देत. भक्तांमध्यें सकाम व निष्काम असे दोन वर्ग पडतात. सकाम उपासनेंतून श्रद्धा निर्माण होऊन मानवाची भक्तिमार्गाकडे प्रगति होते.

भक्तियोग, कर्मयोग, राजयोग व ज्ञानयोग या चार मार्गांपैकीं भक्त कोणत्याही मार्गानें जाणारा असो. भक्ति सर्वांचा आधार आहेच. कर्मयोग्याला कर्मे ईश्वरार्पण बुद्धीनें करावीं लागत असल्यानें भक्ति हा त्यांचा आधार असतो. राजयोगांत प्राणांतिक कष्ट सोसण्याची तयारी ईश्वराच्या आंतरिक ओढीमुळे म्हणजे भक्तीमुळेच शक्य होते. ज्ञानमार्गांतही चिंतनाचा विषय ईश्वरच असल्यानें येथेही भक्ति आवश्यक ठरते.

एकूण भक्ति सर्व मार्गांना आधारभूत असते. आत्मोन्नतीस आवश्यक ईश्वरी सहाय्य मिळवून देणारा भक्ति हाच मार्ग भयरहित व निश्चित स्वरूपाचा आहे. म्हणून श्री माधवनाथ सर्वसाधारण लोकांना भजन–पूजनादि भक्तिमार्गाचा अवलंब करावयास लावून ईश्वराभिमुख करीत. विशेष पात्रता असल्यास मात्र मुद्रा, आसनें, प्राणायामादि योगक्रियांचें क्रमाक्रमाने शिक्षण देत. मच्छिंद्र–गोरक्षप्रणीत नवनाथ संप्रदायाचा राजयोग श्री माधवनाथांनी चांगल्या प्रकारे साध्य केला होता व त्यांच्या भक्तपरिवारांत कांहीं शिष्यांनी राजयोगामध्ये चांगलीच प्रगति केली होती.

श्री माधवनाथ महाराज संचार करीत करीत हिंगणघाट (जि. वर्धा) येथें आले असतां शके १८५८ (सन १९३६) मध्यें त्यांचें निर्वाण घडून आलें. इंदूरच्या भक्तांच्या आग्रहानें त्यांचें कलेवर मोटारीने इंदुरास नेऊन तेथें मोठ्या थाटामाटानें व शास्त्रोक्त रीतीनें समाधीचें कार्य संपन्न करण्यांत आलें: या स्थानीं भव्य नाथमंदिर बांधण्यांत आलें असून तें भाविकांचें व श्रीनाथशिष्यांचें पवित्र क्षेत्र बनलें आहे.

* * *

# श्री साईलीलाचे स्वरूप

ले. चिपळूणकर गुरुजी

श्री साईलीला मासिकाचा मार्च १९७३ चा अंक हाती पडला. श्री साईबाबा माझे अनन्य साधारण निष्ठचे किंवा एकमेव निष्ठेचे आराध्य दैवत असल्यामुळे मी मासिक संपादकीयासुद्धा संपूर्ण वाचतो. त्यात वगळण्याजोगी किंवा सवडीने वाचण्याजोगी अशी गोष्टच नसते. मार्च महिन्याचे संपादकीय मी वाचले तसेच एप्रील ७३ च्या अंकाचेही वाचले, आणि साईलीलामध्ये जो बदल मला हल्ली दिसून येत आहे तो येथे व्यक्त केल्यावाचून रहावत नाहीं.

जवळ जवळ गेले वर्षभर श्री साईलीला मासिकाची गुंफण पाहता त्यात पुष्कळच विविधता, वैचित्र्य व रोचकता दिसून येत आहे. त्यापूर्वी श्री साईलीला एका परंपरानुगत विशिष्ट चाकोरीतूनच प्रसिद्ध होत होते. त्यात कालप्रवाहानुरूप मजकुरात व रचनेत बदल करणे अत्यावश्यक होते. परंतु, कां कोण जाणे, तो होत नव्हता हे खरे. सर्वसाधारण पाहता कविता व तत्वज्ञानविषयक, संत चरित्रात्मक किंवा शास्त्रीय विषय असला तरीही व सर्वतऱ्हेच्या पवित्र मर्यादा राखूनही लिहिलेल्या

साहित्यांत केवळ ते बाबांसंबंधी नाही किंवा शिरडी–विषयक नाही म्हणून त्या साहित्यास श्री साईलीलामध्ये वाव मिळत नसे. हे विधान अतिशयोक्तीचे नाही, व केवळ अंकांच्या परिशीलनावरून मी ते करीत नाही, तर तो माझा वैयक्तिक अनुभव आहे.

श्री साईलीलामध्ये इंग्रजी व हिन्दी मजकुराचे समावेशन हाही स्वागतार्ह भाग होता. आता तर इंग्रजी मासिक वेगळेच निघणार आहे. तेव्हा तेही मराठी इतकेच लोकप्रिय होईल यात शंका नाही. तसेच अन्य भाषेत आवृत्ती निघाव्यात अशी आमची इच्छा आहे.

प्रचलित काही अंकापासून चालू असलेली श्री साईकीर्तने तर इतकी उत्कृष्ट आहेत की आम्हाला कीर्तन करता येत नाही व आम्ही त्या कीर्तनमालेचा उपयोग प्रत्यक्षात करू शकत नाही याचे फार वाईट वाटते. एप्रील १९७३ चा अंक हाती पडला आणि त्याच्या कव्हरावरील चित्रावरच नेत्र स्थिरावले. खरोखरच श्री बाबांच्या जीवितयात्रेत अनंत प्रसंग होऊन गेले आहेत व अशा प्रत्येक प्रसंगाचे एकेक चित्र जर प्रत्येक अंकावर छापले तर थोड्याच दिवसात प्रत्येक जिज्ञासू भक्ताजवळ 'चित्रमय साई–सच्चरित' तयार होईल. सदर बदल निश्चितच कौतुकास्पद आहे व तो तसाच चालू ठेवावा अशी संपादकांस आमची नम्र विनंती आहे.

सध्या श्री साईलीलामध्ये जीं नवीन सदरें व शास्त्रविषयक लेख वगैरे जे क्रमशः सुरू झाले आहेत ते विशेष उल्लेखनीय आहेत. धार्मिक मासिकात आध्यात्मिक व सांस्कृतिक परंतु रोचक व मालारूप क्रमशः प्रसिद्ध होणारे साहित्य असले तर त्याने अशा मासिकांची रुची व लोकप्रियता वाढते व मासिकासही स्थैर्य येते, हे आम्ही वेगळे सांगावयास नको. श्री साईलीलामध्ये होणारे बदल त्याला एक निश्चित लोकप्रियतेचे परिमाण गाठून देऊन दिवसें-दिवस यशस्वितेकडे नेऊन प्रत्येक साई-भक्ताचे हाती ते जाईल यात शंका नाही. श्री साईबाबा स्वतःच आपली लीला जगापुढे ठेवणारे समर्थ आहेत, आम्ही फक्त निमित्तमात्र आहोत.

---

# अनंतता

(गुरुदेव विनोद यांच्या अनंततेवरील अभंगांचे विवेचन)

मनाची मरुभूमी, पाहता पाहता
जीव हा सर्वथा, वेडावतो
ऊन मध्यान्हीचे, तळपते आत
पोळुनी टाकीत, जीवनाशा
मृगतृष्णिका ही, भासे अचानक
येई ऐकू हाक, दूर कोठे
जन्मजन्मान्तरी, चिन्तिलेले स्वप्न
होतसे अवतीर्ण, पुन्हा वाटे

(अ. सं. पृ. २९)

"चंद्रमा मनसो जातः" आणि "मनः चंचलम् अस्थिरम्" ही वचने प्रसिद्ध आहेत. मानवी मन हे केव्हा कशाचा विचार करील व कोठे स्थिर होईल हे सांगता येत नाही. कारण ते कोठे स्थिरच होत नाही. भूमीतून पीक काढताना भूमी सुपीक असली म्हणजे पीक सकस निघते, विपुल निघते. परंतु हीच जर मरुभूमी असेल तर पीक येणे दुष्प्राप्य. मनुष्याचे मन हे चंचल असल्याकारणाने त्याची अवस्था मरुभूमीप्रमाणेच आहे. त्यातही अंतर्मन व बहिर्मन अशी दोन मने आहेत. अंतर्मनाच्या भूमिकेवर जशी प्रतिमा येईल तीच मूळ बहिर्मनावर असेल असे नाही आणि म्हणून या मनांच्या मरुभूमीकडे पाहता पाहता आत्मा, जीव, जणु काही वेडा होऊन जातो. मनुष्य जीवनाचे जे अंतिम ध्येय परमेश्वरप्राप्ती त्याकडे मनासहित जीव लागला पाहिजे. परंतु कालमहिमा विचित्र आहे. त्यात मन हे कोठे स्थिर होत नाही व ध्येयही गाठता येत नाही. परंतु सारखें वाटत राहते, आभास होत राहतात की, या विचित्र कालमहिम्यात मनुष्याच्या जीवनाची आशासुद्धा करपून जात असताना दूर कोठेंतरी मुक्तीची हाक, परमेश्वराची हाक ऐकू येत आहे. परंतु समोर काही न दिसल्यामुळे ही हाक जणुकाही मृगजळातूनच ऐकू येऊन किंवा जन्मजन्मान्तरी ईश्वरीय एकात्मतेचे पाहिलेले स्वप्नच पुन्हा साकार होऊन समोर उभे राहिले आहे असे वाटते. मरुभूमीवरही योग्य संस्कार केले तर तीही सुपीक होऊन उत्कृष्ट फल देऊ शकेल. असेच संस्कार जर मनाच्या मरुभूमीवर सातत्याने केले तर त्यातूनही परमेश्वरप्राप्तीचे ध्येय निश्चितच साकार होऊ शकेल.

निवेदक—चिपळूणकर गुरुजी.

* * *

# रामगीतांजलि

## पुष्प ३

रामचंद्राच्या यज्ञसभेंत कुशलव रामायणाचें गायन करीत आहेत –

स्तब्ध झाली ती सभा तो मुग्ध झाला भूपती
श्रवण करितां कुश–लवांची स्निग्धमधुरा भारती ॥ध्रु.॥

रामचंद्राची कथा ती जानकीची ती व्यथा
रुद्ध कंठें गीत गातां मूर्त होई आर्तता
होउनी एकात्म श्रोते आशयातें उमजती ॥१॥

शब्द कीं मुक्तामणींचे हार मौलिक ओविले
स्वर जणूं कारुण्यकमलें अमृतातें शिंपिलें
ताल धरिती हात सारे, मस्तकेंही डोलती ॥२॥

रम्य साहित्यार्थ–खाणी तेज–मार्दव लेवुनी
प्रगटल्या नवरत्नयुक्ता छंदरूपें घेउनी
सूर सोज्ज्वळ रागगामी एकमेकां सोबती ॥३॥

शास्त्रवेत्ते काव्यप्रेमी शब्दरचनापंडित
धर्मनीतीचे विशारद वेदविद्याभूषित
रसिक नागर नादवेडे 'साधु !' म्हणुनी डोलती ॥४॥

वेष धरिले तापसांचे बांधिले कच मस्तकीं
वदनिं आभा प्रेम नयनीं मूर्ति देहांची निकी
अर्थवाही हावभावां पाहुनी जन मोहती ॥५॥

अग्नीच्या ज्वाळेपरी तें रूप दिसतां आगळें ।
जानकीच्या आठवानें राम हृदयीं कळवळे ।
घाव पूर्वीचे जिव्हारीं शल्य होउन वाहती ॥६॥

रामचंद्राचींच बिंबें जनतडागीं शोभलीं
बुधबृहस्पति बाल होउनी चालती कीं भूतलीं
काय प्रल्हादासवें ये ध्रुव वळोनी खालतीं ? ॥७॥

संपतां तीं मंजुगानें राघवानें मोहुनी
बालकांतें आदरोनी धरियलें आलिंगनीं
होइना तृप्ती कुणाची मधुप कीं लोभावती ! ॥८॥

—दिवाकर धैसास.

# निरंतर - आत्मतत्व

विश्व आगळे आणि त्याहुनी नसेचि मी आगळा ।
अतूट जोडी असे आमुची भंग न मैत्रीला ॥१॥

सूर्यापासुनि राहुं ना शके प्रकाश तो वेगळा ।
धवलपणाते सोडुनि कर्पुर राहि न कधि एकला ॥२॥

अविभाज्य मी घटक विश्वीचा एकचि मन आम्हाला ।
खेळ खेळु अम्ही रम्य मजेचा घेउनि प्रेमाला ॥३॥

दुजेपणाने जरी हा दिसे खेळ बाह्य नजरेला ।
अज्ञानचि तें असे येथलें कारण भासाला ॥४॥

माळेमधली फुलें वेगळी भासति जरि नयनाला ।
आंतुनि त्यांते धरी सूत्र तें हीच देवलीला ॥५॥

मानव-निर्मित भेद हेचि तें नांव दुजे दुःखाला ।
निसर्ग परि हा अभेद राखुनि बिलगि अनंताला ॥६॥

विश्व हेचि मी अवघे नटलो, दुजा न विस्तरला ।
आत्मतत्व हें एकचि असुनी दावि विविधतेला ॥७॥

— शाम जुवळे

# -- साक्षात्कार --

धुंडिलीं अगणित तीर्थें पाउलीं ।
कां मिळेना श्रांत पथिका साउली ।।ध्रु.।।

हिम नगाच्या शीत गर्भी शोधिलें ।
दक्षिणेच्या सागरा संबोधिलें ।।

शैलशृंगे आणि गुंफा शोधिल्या ।
खोल कुहरीं करुण हांका मारिल्या ।।

स्तूप, क्षेत्रे, मंदिरे धुंडाळिली ।
कां मिळेना श्रांत पथिका साउली ।।१।।

रविकरांनी दाविली मायावती ।
भौतिकाच्या विविध सुंदर आकृती ।।

येइना आत्मानुभूति चिद्घना ।
की न हो सुफलित माझी साधना ।।

असती कां तूं सप्तसागर तळवटीं ।
घननीळा कां नील व्यापक नभघटीं ।।

भक्तिप्रेमीं मुक्ति तुज कां लाभली ? ।
कां मिळेना श्रांत पथिका साउली ।।२।।

सप्तस्वर गुंफोनि तुजला गायिले ।
जप तपादी मार्गही चोखळिले ।।

भक्तिपुष्पें वाहुनी हांकारिले ।
नर्तनीं नी कीर्तनीं अवगाहिलें ।।

मोहमाया देहसौख्यें त्यागिली ।
कां मिळेना श्रांत पथिका साउली ।।३।।

गंधवेडा धांवतो मृगकस्तुरी ।

धुंद झालो मूढ मी तैशापरी ॥

गवसलासी बा अनंता शेवटीं ।

मी मला शोधीत होतो हिंपुटी ॥

अतरात्मीं ज्ञानियांची माउली ।

कां मिळेना श्रांत पथिका साउली ॥४॥

— रमाकांत वि. सरमळकर.

# माधव स्मृति

( 'आरति साईबाबा' ही बाबांची प्रसिद्ध आरति रचणारे श्री. माधव वामन आडकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ श्री. रा. मा. आडकर यांनी खालील कविता लिहून पाठविली आहे. )

(वृत्त—चंद्रकान्त)

रोज सकाळी सायंकाळी स्मरा नित्य पूर्वजा ।

माधवचरणीं ठेवा मस्तक घेतिल दोषरजा ।

माधव वामन आडकर म्हणुनी धानोरे गांवीं ।

पूज्य आपुले पूर्वज येथे स्मृती असूं द्यावी ॥१॥

साईबाबा-संग लाभला, 'पंतोजी' म्हणती ।

साईचरणीं मिणमिण करिते रात्रंदिन पणती ।

माधव-चरणी साई-चरणी गाईली आरती ।

'सुखें पावशिल' वदले साई कर डोईवरती ॥२॥

दासगणू जो दास म्हणविला साईचा भक्त ।

माधवांस तो बंधु मानुनी जाहला विरक्त ।

जीवन-ताका घुसळुन त्यांतुन लोणी काढियलें ।

यमराजानें सेवक त्याचे 'लोणिस' धाडीले ॥३॥

ॐ तत्सत् ची गीता तोंडीं प्राणज्योत शांत ।

स्मरण तयांचे सुखविल तुम्हा 'माधव-सिद्धांत' ।

गुण तयांचे गातच राहूं मोक्षपदीं ठेले ।

मस्तक नमलें दुःखचि हरलें—सांगोनी गेले ॥४॥

रा. मा. आडकर

# साई तूंच एक आधार

साई तूंच एक आधार साई तूंच एक आधार ॥ ध्रु. ॥

संसाराच्या कडक उन्हानें
शिणलों साई चौबाजूनें
सद्‌गुरु साई तुझ्या दर्शनें
मन झालें अनिवार १

अल्ला मालिक दयाळु असशी
भक्तां संकटिं झेलुनि धरिशी
परिसुन आलें तव पायाशीं
दर्शन दे साकार २

ध्यानीं मनिं हो दिवसा रजनी
रूप साइचें भरलें नयनीं
'साई, साई' चा माझे वदनीं
होतो नित्य पुकार ३

—सौ. शांता अं. सरोदे.

# श्रीसाई

तेरा नाम सबसे प्यारा है
तेरे बिन कौन हमारा है
नहीं चाहिये जमाने की दौलतें
तेरे नाम से अपना गुजारा है

तेरी शरण में आये हम
मिली खुशी मिटे सारे गम
तेरे दरपे सदा झुकेंगे हम
न जमानेसे झुकना गंवारा है

तूने जो राह दिखाई है
जिंदगी अब संवर आई है
सह लेंगे सितम जमाने के
'गर तेरा हमें सहारा है

—रमेश 'आत्मा'

# शिरडी-वृत्त एप्रिल १९७३

या महिन्यांत रामनवमी उत्सव आल्यामुळें भक्तांची गर्दी बरीच होती. कांहीं कलाकारांनीं श्रींच्यापुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें :-

कीर्तन :-१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तनें नेहमीं प्रमाणें झाली. २) ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांची तीन कीर्तनें झाली. ३) श्रीमती इंदिरा विष्णू जोशी यांचे कीर्तन झालें.

प्रवचन :- १) श्री. निवृत्तिराव पाटील गोंदकर शिर्डी. २) ह.भ.प. नारायण का. कुळकर्णी, पंढरपूर.

शास्त्रोक्त गायन, भजन, वादन वगैरे कलाकारांची नांवे :- १) सौ. ज्योत्स्नाबाई भोळे, पुणे. २) सौ. रोहिणीबाई फडकर, नाशिक. (३) सौ. बासरीताई सी. मोहनपुरकर, औरंगाबाद ४) श्रीसाईनाथ नवरंग गायन पार्टी, श्री. धर्मनाथ रेगे. ५) श्री. गुटेकरं श्री कृष्ण ६) श्री प्रदीप सामंत व श्री. सुरेश सामंत ७) श्री. रामभाऊ कुळकर्णी ८) श्री. मुरलीधर अग्रवाल मुंबई ९) कु. द्वारका प्रभू मुंबई १०) श्री. निपुल कुर्लेकर मुंबई ११) श्री. वामनराव पाचंगे उदगीर १२) श्रीराम सातर्डेकर मुंबई १३) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई १४) सौ. नीला प्रभू, मुंबई १५) श्री. रामचंद्र द. वाडेकर पिंपळवाडी १६) श्री. रघुनाथ बा. सांडभोर पुणे. १७) सौ. शकुंतला मो. जोशी, नाशिक १८) श्री. वसंत ओं. देवभानकर शिर्डी. १९) श्री. दत्तुसिंग रजपुत, हैद्राबाद २०) सौ. मनोरमाबाई टिल्लू मुंबई २१) श्री. बाळोबा कुलकर्णी, सावळी-विहीर २२) श्री. विनायक धो. वाडेकर खरसुंडी. २३) श्रीमती राधाबाई ह. पवार. २४) श्री. शेख इस्माईल, रुई. २५) श्री. पोपटराव गो. दूधवडे २६) श्री. आदिनाथ मुरंगळ २७) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर २८) श्री. बाळा भाऊ गुरव शिर्डी २९) श्री. जयवंतराव भा. भारदे, अहमदनगर. ३०) श्री. उत्तमराव सु. उन्हाळे. ३१) श्री. नौशेर इराणी. ३२) श्री. शंकर रा. सालकर ३३) श्री. नानासाहेब शिंदे शिर्डी. ३४) श्री. रामचंद्र भा. कुलकर्णी.३५) श्री. दत्तात्रय पु. मतेपाटील. ३६) श्री. ज्ञानेश्वर वि. शिंपी साकोरी. ३७) श्री. दिगंबर बा. नारकर मुंबई. ३८). श्री. शेख ओमर पटेल अस्तगांव ३९) श्री. नथ्थुजुमन घोर ४०) श्री. दत्तात्रय द. केदारे ४१) श्री विलासन् गायकवाड ४२) श्री. एम. जार्ज. ४३) श्री बंडू वाबळे ४४) श्री. कृष्णा गो. नायकर मुंबई ४५) श्री. ज्ञानेश्वर वैद्य शिर्डी. ४६) श्री. अहमद गुलाब पठाण नांदगांव ४७) श्री. रत्नाकर कोराटे शिर्डी. ४८) श्री. किसन स. खरात शिर्डी. ४९) श्री. दगडू सखाराम त्रिभुवन ५०) कु. मणी एम्. हैद्राबाद. ५१) श्री. रघुनाथ बा. मुकूट जि. नांदेड.

५२) श्री. राघू भा. सालकर कोपरगांव ५३) श्री. सोनबाबा बा. राऊत, धातुर ५४) श्री. विठ्ठलराव मांजरेकर शिर्डी. ५५) श्री. मधुकर शं. दिवेकर पिपळवाडी. ५६) श्री. लक्ष्मणराव रा. पेंटर, देवळाली. ५७) श्री सखाराम रा. गुरव बेट कोपरगांव ५८) ह.भ.प. तुकाराम बुवा आजेगांवकर, परभणी ५९) श्री. ह.भ.प. छगनबुवा ६०) राष्ट्रपती पदकाचे मानकरी जादूगार श्री. भारतसिंह चंदेल सोनई यांचे जादूचे प्रयोग झाले. ६१) सौ. सुमित्राबाई मा. राणे मुंबई शास्त्रोक्त गायन ६२) सौ. शोभना म. जावळे शा. गायन ६३) सौ. अंजनीबाई लोलेकर (ऊर्फ बँकर) शास्त्रोक्त गायन ६४) श्री रामदास काशिनाथ लोलेकर तबलावादन ६५) कु. सुवर्णा रा. बँकर मुंबई. गायन ६६) श्री. साईराम रा. बँकर मुंबई तबलावादन ६७) श्री. ज्ञानेश्वर महिला भजन मंडळ कोकण नगर मुंबई यांचे भजन झाले.

माननीयांच्या भेटी :– १) श्री. पी. व्ही. टेकाडेसाहेब सिव्हील जज्ज येवला २) श्री. बी. एस. कुलकर्णी, सुपरिंटेंडेन्ट पे अ‍ॅण्ड अकाऊन्ट ऑफिस मुंबई. ३) स्वामी श्रद्धानंदजी, निर्मळ जि. ठाणे ४) श्री एम. पी. के. मेनन डायरेक्टर ऑफ ऑल इंडिया रेल्वेबोर्ड न्यू दिल्ली. ५) कर्नल एन् के. अंकलेसरिया. ६) श्री. आर. के. अंकलेसरिया जनरल मॅनेजर गुजराथ स्टेट रोड ट्रा. कार्पोरेशन अहमदाबाद. ७) श्री. आर. प्रेमकुमार मेनन, आय. ए. एस. अ‍ॅडिशनल कलेक्टर, अहमदनगर ८) श्री. कुडचडकर साहेब सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, बी. अँड सी. सर्कल पुणे.

हवापाणी :– शिर्डी येथें कडक उन्हाळा सुरू झाला असून दरवर्षापेक्षा उन्हाचा दाह जास्त जाणवतो. तरी सायंकाळी ७ नंतर हवेंत पूर्णपणें गारवा असतो त्यामुळे रात्रीचे भक्तांना शिरडींत उन्हाचा त्रास असा जाणवत नाही. पिण्याचे व सांडपाण्याची परिस्थिती थोडीशी नाजूक आहे. तरी पाण्याचा त्रास भक्तांना जाणवणार नाही याबद्दल संस्थान दक्ष आहे.

—*—

# श्रीरामनवमी उत्सव कार्यक्रम

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिर्डी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे दि. १०–४–७३ ते दि. १२–४–७३ पर्यंत ३ दिवस थाटात साजरा झाला. संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांनीं उत्सवाचे तयारी-साठी सर्व खाते प्रमुखांची एक महिना अगोदर सभा घेऊन सर्व कामाचा व खर्चाचा विचारविनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणें मांडवाचे काम, पाण-पोई, संरक्षण, साफ सफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, वाजंत्री बॅण्ड चौघडा, अन्नदान वगैरेची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवण्यात आली होती.

**उत्सवाचा पहिला दिवस :–** दि. १०–४–७३ मंगळवार रोजी नित्यकार्यक्रमा–व्यतिरिक्त श्रींचे फोटोची व चरित्र ग्रंथाची पहाटे मिरवणूक गुरुस्थान मार्गे श्रींच्य द्वारकामाईत गेली. तेथे चांदीच्या भव्य सिंहासनावर श्रींच्या फोटोची स्थापना करून चरित्र वाचनास सुरुवात झाली. त्यानंतर इतर कार्यक्रम सुरु झाले. दुपारी ४ ते ६-४५ पर्यंत ह.भ.प. अनंतराव आठवले पुणे यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९ पर्यंत सौ. रोहिणीबाई फडकर नासिक यांचे गायन झाले. ९-१५ ते ११-४५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गांवातून काढण्यात आली. मिरवणुकीचे वेळीं पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनीं निरनिराळे वेष धारण करून नकलांचे कार्यक्रम केले व स्थानिक लोकांनी गारुड, भारुड, वगैरे कार्यक्रम केल्यानंतर वाद्यांच्या गजरांत पालखी समाधिमंदिरांत आली व शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :–** दि. ११–४–७३ बुधवार. श्रींच्या दर्शनासाठीं पहाटे पासूनच गर्दी झाली होती. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व चरित्र ग्रंथवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून समाधिमंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. गांवातील भाविक मंडळी कोपरगांव मुक्कामी गोदावरी नदीत रात्रौ १ वा. आंघोळ करून गोदावरीनदीचे पाणी घेऊन ९ मैल कावडी घेऊन पायी चालत आली. सकाळी ६–३० वा. मा. रिसीव्हर साहेब यांनीं कावडीची पूजा केल्यावर अंदाजे सात आठशे कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गांवातून आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्यानें बाबांच्या समाधीला स्नान घातले. हा कार्यक्रम

दोन तास चालला होता. सकाळीं १० ते १२-३० पर्यंत ह.भ.प. अनंतराव आठवले यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी निशाणांची व रथाची मिरवणूक निघाली. रात्रभर जागर झाला. मंदिर भक्तांना दर्शनासाठी रात्री खुले ठेवले होते. ५८ कलाकारां ी श्रींचे पुढे आपले कलेची हजेरी दिली. त्यांना संस्थान तर्फे १ रुपया व नारळ प्रसाद म्हणून देण्यात आला. रात्रौ शोभेची दारू उडविण्यांत आली.

**उत्सवाचा तिसरा दिवस :–** दि. १२–४–७३ गुरुवार. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सामुदायिक अभिषेकपूजा व प्रसाद रूपाने कापडविक्री झाल्यावर ह.भ.प. अनंतराव आठवले यांचे गोपळाकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम सकाळी १०-३० ते १२-३० पर्यंत झाला. रात्रौ गुरुवारची पालखी झाल्यावर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला. या उ त्स ांत तीन दिवसात मिळून एकूण ४५९० गोरगरिबांना मिष्टान्नासह अन्नदान करण्यांत आलें.

मुंबईकचेरींतही रामनवमी उत्सव थाटात साजरा झाला. सकाळी ९। ते १० ॥ गुरुभक्त बा. सी. गुप्ते यांचें गुरुभक्तिवर भजन झाले. १० ॥ ते १। पर्यंत थोर साईभक्त श्री. बी. आर्. काकडे यांचें कीर्तन झालें. सायंकाळीं ६ ते ७ कलावती देवी प्रासादिक भजन मंडळाचें भजन होऊन शेवटीं सर्वांस तीर्थप्रसाद व शीतपेय देण्यांत आलें.

Sai Baba Tutorial Academy's

# Inter Arts Classes

(1943)

Kshatriya Niwas, Portuguese Church, Girgaon,
Opp. Lakhani Book Depot, Bombay 4. Tel. 354337

*

**The only special Inter Arts Classes in Bombay**

*

100 % Results last 19 consecutive years.

*

Logic, Economics, English, French, Etc.

*

Taught with exhaustive cyclostyled notes.

*

Probable questions with class-getting answers issued every year for the University Examination with 100 % accuracy.

Batches : March/October. Morning/Evening.
Admissions commence from 11th June 1973.
Reopen on 20th June 1973.

Regd. No. MH 527

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किमत | आकार | किमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | | | ३-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४.

मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.